सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. १२ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ४० पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ...म्हणून पाकिस्तानने सादर केला शस्त्रसंधीचा प्रस्ताव

नवी दिल्ली : पाकिस्तान आणि भारत यांच्यात सुरू झालेली लढाई आणखी तीव्र होईल असे वाटत असतानाच दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करत असल्याचे जाहीर केले. या निर्णयामुळे अनेकजण चक्रावले. वेगवेगळे तर्कवितर्क सुरू झाले. पण ज्यांनी या घडामोडी अतिशय जवळून बघितल्या त्यांना पाकिस्तानने शस्त्रसंधीचा प्रस्ताव का सादर केला हे व्यवस्थित समजले. भारताच्या हवाई हल्ल्यांमध्ये पाकिस्तानच्या ११ हवाई तळांचे नुकसान झाले. हे तळ वापरता येणार नाही अशा स्थितीत पोहोचले. पाकिस्तानच्या -थ-उड हवाई संरक्षण प्रणालीचे नुकसान झाले. भारतीय सैन्याने वेगाने केलेल्या कारवाईमुळे पाकिस्तानच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या अनेक पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. पाकिस्तानच्या सैन्याचा कणा पुरता मोडला. भारतासोबत झालेल्या संघर्षामुळे आतापर्यंत पाकिस्तानचे अब्जावधी रुपयांचे अवघ्या चार - पाच दिवसांत नुकसान झाले. कोट्यवधी रुपयांची शस्त्रे नष्ट झाली. भारताने पाकिस्तानला चार दिवसांत चार मोठे धक्के दिले.

१. पाकिस्तानचे ११ हवाई तळ उद्ध्वस्त

भारतीय सैन्याने पाकिस्तानचे ११ हवाई तळ उद्ध्वस्त केले. नूर खान/चकलाला एअरबेस (रावळपिंडी), पीएएफ बेस



रफीकी (शोरकोट), मुरीद एअरबेस (पंजाब), सुक्कुर एअरबेस (सिंध), सियालकोट एअरबेस (पूर्व पंजाब), पसरूर एअरस्ट्रीप (पंजाब), चुनियन (रडार/सपोर्ट इन्स्टॉलेशन), सरगोधा (मुशफ बेस) एअरबेस, स्कार्डू एअरबेस (गिलगिट-बाल्टिस्तान), भोलारी एअरबेस (कराचीजवळ) आणि जेकोबाबाद एअरबेस (सिंध-बलुचिस्तान) यांचे भारताने नुकसान केले.

२. पाकिस्तानची -थ-उड हवाई संरक्षण प्रणाली

भारताने पाकिस्तानची -थ-उड (एअरबॉर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टीम) हवाई संरक्षण प्रणाली नष्ट केली. पाकिस्तानच्या एका -थ-उड ची किंमत पाच हजार ८४५ कोटी रुपये होती. यामुळे -थ-उड नष्ट झाल्याने पाकिस्तानचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले.

३. भारताच्या कारवाईत पाच मोठ्या दहशतवाद्यांसह किमान १०० दहशतवादी ठार

भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये कारवाई केली. या कारवाईत पाच मोठ्या दहशतवाद्यांसह किमान १०० दहशतवादी ठार झाले. मुदस्सर खादियान, हाफिज मुहम्मद जमील, मोहम्मद युसूफ अझहर, खालिद उर्फ अबू अक्सा आणि मोहम्मद हसन खान हे पाच मोठे दहशतवादी ठार झाले.

४. दहशतवाद्यांचे लाँचपॅड नष्ट

भारताच्या ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानमधील दहशतवादाचा कणा जवळजवळ मोडला आहे. भारतीय सैन्याने दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ला केला. भारतीय हल्ल्यांमध्ये दहशतवादी लाँचपॅडपासून त्यांच्या मुख्यालयापर्यंत सर्व काही उद्ध्वस्त झाले आहे.

भारताने केलेल्या कारवाईत पाकिस्तानच्या सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या अनेक पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. पाकिस्तानच्या सैन्याचा कणा पुरता मोडला. पाकिस्तानच्या लष्कराच्या अनेक पायाभूत सुविधा, दहशतवाद्यांचे लाँचपॅड, पाकिस्तानचे हवाई तळ, तसेच पाकिस्तानच्या लष्कराच्या कमांड-अँड-कंट्रोल सेंटर्स, रडार साइट्स आणि शस्त्रास्त्रे साठवण्याच्या क्षेत्रांचे नुकसान झाले. पाकिस्तानच्या पसरूर आणि सियालकोट हवाई तळांची रडार प्रणाली आणि हवाई संरक्षण प्रणाली नष्ट झाली. दहशतवादी हल्ला केला किंवा भारतीयांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला तर भारत कुठेही आणि कधीही जाऊन हल्ला करण्यास समर्थ आहे, याची जाणीव पाकिस्तानला झाला. तसेच दहशतवाद संपेपर्यंत सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित राहणे म्हणजे स्वतःचे मोठे नुकसान करुन घेण्यासारखे आहे, याची जाणीव पाकिस्तानला झाली. यामुळे पाकिस्तानने शस्त्रसंधीचा प्रस्ताव भारतापुढे सादर केला आहे.

## सिंधुदुर्गमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजन

सिंधुदुर्ग : मालवण किनारपट्टीवरील किल्ले राजकोट जवळ राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा हातातली तलवार उंचावलेला असा भव्य पुतळा उभारला आहे. महाराजांच्या या पुतळ्याचे दर्शन घेऊन त्याचे मुख्यमंत्र्यांनी पूजन केले. पूजनानंतर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी बोलताना मुख्यमंत्र्यांनी पर्यटनाला चालना देण्यासाठी राजकोट किल्ला परिसराचा विकास करणार असल्याचे जाहीर केले.



शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी मालवणमध्ये किल्ले राजकोट जवळच्या परिसरात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, पालकमंत्री नितेश राणे यांची विशेष उपस्थिती होती. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, खासदार नारायण राणे, माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार दीपक केसरकर, आमदार निलेश राणे, आ. निरंजन डावखरे, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, आ. कालिदास कोळंबकर सार्वजनिक बांधकाम विभाग अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, सा. बां. विभाग (रस्ते) सचिव सदाशिव साळुंखे, बांधकाम सचिव संजय दशपुते, सा. बां. कोकण प्रादेशिक विभाग मुख्य अभियंता शरद राजभोज, जिल्हाधिकारी अनिल पाटील हे पण याप्रसंगी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या पहिल्या १०० दिवसांत महाराजांच्या पुतळ्याचे काम हाती घेतले.

### पंतप्रधानांकडून राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त शुभेच्छा

नवी दिल्ली, ११ मे - पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. श्री. मोदी यांनी आपल्या शास्त्रज्ञांप्रती अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त केली तसेच १९९८ मधील पोखरण चाचणीची आठवण करून दिली आहे. त्यांनी विज्ञान आणि संशोधनाच्या माध्यमातून भावी पिढ्यांना सक्षम करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार देखील केला आहे. 'एक्स' या सामाजिक संपर्क माध्यमा वरील आपल्या संदेशामध्ये पंतप्रधानांनी लिहिले: राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! हा दिवस आपल्या शास्त्रज्ञांविषयी अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा आहे आणि १९९८ मधील पोखरण चाचणी आठवण्याचा आहे.

## मान्सून केरळमध्ये २७ मे पर्यंत पोहोचणार

नवी दिल्ली : भारतीय अर्थव्यवस्थेत पावसाला महत्त्व आहे. यामुळे दरवर्षी देशात मान्सूनचे आगमन कधी होणार याकडे अनेकांचे लक्ष असते. हवामान विभागाच्या अंदाजानुसार १३ मेपर्यंत दक्षिण अंदमानचा समुद्र, बंगालच्या उपसागराचा आग्नेय भाग आणि निकोबार बेटांपर्यंत मान्सून पोहोचणार आहे. तिथून वेगाने पुढे वाटचाल करत मान्सून केरळमध्ये २७ मे पर्यंत पोहोचेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

साधारण एक जून पर्यंत केरळमध्ये मान्सून पोहोचतो. पण यंदा मान्सून केरळमध्ये २७ मे पर्यंत पोहोचेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मागील पाच वर्षांत दोनवेळा मान्सून १ जूनच्या आधी केरळमध्ये पोहोचला आहे. केरळमध्ये २०२४ मध्ये ३० मे तर २०२२ मध्ये २९ मे रोजी मान्सून पोहोचला होता.

वायव्य भारतातील किमान तापमान, दक्षिण द्वीपकल्पामध्ये मान्सूनपूर्व काळामध्ये पडणारा पाऊस, इंडोनेशियावरील वरच्या थरातील उष्णकटिबंधीय क्षेत्रीय वारा, ईशान्य हिंदी महासागरावरील खालच्या थरातील उष्णकटिबंधीय क्षेत्रीय वारा, दक्षिण चीन समुद्रावरील थर्मल रेडिएशन, उष्णकटिबंधीय वायव्य प्रशांत महासागरावरील समुद्रसपाटीचा सरासरी दाब हे तपासून भारतात मान्सून कधीपर्यंत पोहोचणार याचा अंदाज हवामान विभाग व्यक्त करतो. यंदाही याच निकषांच्या आधारे हवामान विभागाने मान्सूनच्या आगमनाची भाकीत वर्तवले आहे. वातावरणात आयत्यावेळी बदल झाला तर या अंदाजात चार ते सात दिवस पुढे - मागे फरक पडण्याची शक्यता असते.

केरळमध्ये मान्सून पोहोचल्यानंतरच महाराष्ट्रात कधी पर्यंत पोहोचणार याचा नेमका अंदाज वर्तवणे सोपो जाते. प्राथमिक अंदाजानुसार मुंबईत १० जून आणि महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात १५ जून पर्यंत मान्सून पोहोचण्याची शक्यता आहे. अरबी समुद्रात पश्चिम किनारपट्टीला समांतर मुंबईकडे येणाऱ्या मान्सूनच्या प्रवाहात किती ताकद आहे याचाही महाराष्ट्रात येणाऱ्या मान्सूनवर परिणाम होऊ शकतो. यामुळे केरळमध्ये मान्सून पोहोचला की महाराष्ट्राबाबतचा नेमका अंदाज वर्तवता येईल, असे हवामान विभागाने सांगितले. मध्य महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये तसेच मराठवाडा, विदर्भ येथे १४ मेपर्यंत अवकाळी पावसाची शक्यता आहे, असेही हवामान विभागाने सांगितले. अवकाळी पावसामुळे राज्यातील निवडक जिल्ह्यांचे तापमान कमी होण्यास मदत होण्याचीही शक्यता आहे.

## पंजाबमधील अनेक शहरांमध्ये पुन्हा ब्लॅकआउट, राजस्थानमधील जिल्ह्यांत रेड अलर्ट जारी

नवी दिल्ली: भेकड्या पाकिस्तानने स्वतःहून पुढे येत भारताविरुद्धचा सुरू असलेला संघर्ष थांबवत असल्याचे सांगत पुन्हा एकदा फना काढण्याचा प्रयत्न केला आहे. दोन्ही देशांनी युद्धजन्य परिस्थितीला विराम लागू केल्यानंतर अवघ्या काही तासांतच पकड्यांनी पुन्हा एकदा भारताच्या सीमेलगत असलेल्या शहरांवर हल्ले चढवले. पण भारतीय लष्कराने त्यांचा हा प्रयत्न देखील हाणून पाडला आहे.

पाकिस्तानने पुन्हा केलेल्या हल्ल्यानंतर, पंजाबमधील फिरोजपूर, गुरुदासपूर, मुक्तसर, होशियारपूर, बर्नाला, मोगा, पठाणकोट, फाजिल्का, कपूरथला आणि इतर अनेक



जिल्ह्यांमध्ये पुन्हा एकदा ब्लॅकआउट लागू करण्यात आला. राजस्थानमधील पोखरण आणि बारमेर येथे ड्रोन हल्ले करण्यात आले जे हवेतच नष्ट करण्यात आले. यानंतर, सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जाहीर करण्यात आला. तर बाडमेरमध्ये हाय रेड अलर्ट जारी करण्यात आला.

पोखरण आणि बारमेरमध्ये ड्रोन हल्ले

पाकिस्तानकडून राजस्थानमधील पोखरण आणि बारमेर येथे ड्रोन हल्ले करण्यात आले, जे भारताने हवेतच नष्ट केले. यानंतर, सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आणि बाडमेरमध्ये हाय रेड अलर्ट जारी करण्यात आला. दरम्यान, जोधपूरमधील सर्व बाजारपेठा बंद होत्या.

पंजाबमधील जिल्हयात ब्लॅकआऊट

पंजाबमधील जिल्ह्यांत शनिवार रात्रीचा ब्लॅकआउट पुन्हा एकदा सतर्क राहण्याची घोषणा करून गेला. भटिंडामध्ये लोकांनी स्वतःहून ब्लॅकआउट लागू केले. अमृतसरमधील श्री गुरु रामदास जी आंतरराष्ट्रीय विमानतळाभोवती ड्रोनची हालचाल सुरू असल्याने सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

आदल्या दिवशीही पाकिस्तानने पंजाबमध्ये अनेक ठिकाणी ड्रोन डागले होते.

### 'सीए' अभ्यासक्रमाच्या परीक्षा लांबणीवर

पुणे : देशातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाने (आयसीएआय) सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट) अभ्यासक्रमाची परीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यात ९ ते १४ मे या कालावधीत होणाऱ्या सीए अंतिम, इंटरमिजिएट, पोस्ट क्वॉलिफिकेशन कोर्स या परीक्षांचा समावेश आहे. आयसीएआयने प्रसिद्धिपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली. आयसीएआयने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २ ते १४ मे या कालावधीत परीक्षा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात इंटरमिजिएट परीक्षेत गट-१ ची परीक्षा ३, ५ आणि ७ मे रोजी, तर गट-२ मधील परीक्षा ९, ११ आणि १४ मे रोजी होणार होती.

## जगप्रसिद्ध साई मंदिरात हार, फुल, प्रसाद बंदीचा निर्णय : गोरक्ष गाडीलकर

शिर्डी : भारत पाकिस्तान युद्धजन्य परी स्थितीच्या पार्श्वभूमीवर देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान असलेल्या शिर्डी येथील श्री साई संस्थान प्रशासनाने मोठा निर्णय घेतला असून रविवार दि.११ में २०२५ पासून जगप्रसिद्ध साई समाधी मंदिरात फुलहार, प्रसाद नेण्यास मनाई असणार आहे.या निर्णयाची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

दरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने शिर्डीत साई संस्थानच्या सुरक्षा यंत्रणेचा आढावा घेतला.याप्रसंगी साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अतिरिक्त पोलीस अप्पर पोलीस अधीक्षक श्री कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमणे, शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, पी.आय प्रदीप देशमुख आधीच संस्थांचे सुरक्षा अधिकारी उपस्थित होते.यावेळी साई मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. शिर्डीत देश-विदेशात दररोज हजारो भक्त साई समाधीच्या दर्शनासाठी येतात, फुलहार आणि प्रसाद साई समाधीवर चढवतात, भारत-पाकिस्तान युद्धजन्य स्थितीच्या पार्श्वभूमीवर भाविकांना फुलहार आणि प्रसाद साई समाधी मंदिरात नेण्यास आता मनाईचा असणार आहे. तसा निर्णय पुढील आदेशापर्यंत घेण्यात आला आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच साई संस्थानला धमकीचा मेल देखील प्राप्त झाला आहे. या अगोदर अनेकदा धमकीचे पत्र देखील साई संस्थानला मिळाले आहेत. परंतु यावेळची परिस्थिती वेगळी आहे. भारत-पाकिस्तान या दोन्ही देशातील तणावाची परिस्थिती आणी पाकिस्तानकडून सुरू असलेल्या ड्रोन हल्ल्यामुळे साई संस्थानची सुरक्षा यंत्रणा 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात आली आहे.

पवित्र सुवर्ण मंदिर असलेल्या अमृतसर शहरावर पाकिस्तानने ड्रोनचा हल्ला चढवला होता.भारतीय लष्कराने हा हल्ला निष्फळ केला. परंतु या हल्ल्यांमुळे पाकिस्तान भारतातील धार्मिक स्थळ टार्गेट करत असल्याचे निश्चित झाले.

यामुळे भारतातील प्रमुख धार्मिक स्थळांची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

### उज्जैन महाकालला जाणाऱ्या खाजगी बस अपघातात महाराष्ट्रातील ३ महिला भाविकांचा मृत्यू



सातारा: उज्जैन येथे देवदर्शनास चाललेल्या खासगी प्रवासी बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातात तीन महिला भाविकांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात रविवारी, दि. ११ रोजी फलटण तालुक्यातील सालपे येथील बिरोबा मंदिरासमोर पहाटे २.३० च्या दरम्यान झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सलमा इम्तियाज सय्यद (२४), रजनी संजय दुर्गुळे (४८) अशी अपघातातील मृतांची नावे आहेत, तर अन्य आठ जण जखमी झाल्याची माहिती आहे. दरम्यान, या अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा सातारा सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. इचलकरंजी येथील खासगी प्रवासी बस (एमएच ०४ सीपी २४५२) ही भाविक महिलांना घेऊन उज्जैन येथे देवदर्शनास निघाली होती. ही बस वाठार स्टेशन मार्गे सालपे घाट उतरून लोणंद दिशेकडे शनिवारी(दि.१०) मध्यरात्री जात होती. बस बिरोबा मंदिराजवळ आली असता लोणंद बाजूकडून साताऱ्याकडे जाणारा ट्रक (एमएच ४२ बीएफ ७७८४) या दोघांमध्ये धडक होऊन भीषण अपघात झाला. या घटनेनंतर सालपे ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन भाविकांना मदत करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान लोणंद पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. जखमींना लोणंदच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## माध्यमकर्मींनी उपेक्षित महिलांचा आवाज बनावे: विजया रहाटकर

### एकदिवसीय महिला माध्यमकर्मी संमेलन संपन्न

पुणे, ता.११: महिलांना सक्षम केल्याशिवाय देशाची प्रगती अशक्य आहे. त्यामुळे माध्यमक्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांनी विशेष करून महिला सक्षमीकरणामध्ये योगदान द्यावे. त्यांनी ग्रामीण आणि उपेक्षित महिलांचा आवाज बनावे, असे मत महिला आयोगाच्या राष्ट्रीय अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्त केले.

आयएमडीआरच्या वीर सावरकर सभागृहात आयोजित व्हीएसके पुणे फाउंडेशन संचालित विश्व संवाद केंद्रातर्फे आयोजित 'महिला माध्यमकर्मी संमेलन २०२५'च्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. महिला माध्यमकर्मींनी आपल्या वार्तांकनातून बदल घडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन रहाटकर यांनी केले.

त्या म्हणाल्या, जसे आई प्रेम, लाड करते, प्रसंगी कठोर होऊन रागावतेही, अशा मातृत्व भावामधून महिलांनी पत्रकारिता करावी. स्वतः च्या क्षमता ओळखून महिलांनी पुढे यायला हवे. सक्षम असतानाही सादरीकरणाअभावी त्यांने नेतृत्त्वाची संधी मिळत नाही. महिलांनी




आता स्वतः ब्रँड बनत सर्वच क्षेत्रात नेतृत्त्व करावे. यावेळी विश्व संवाद केंद्राचे कार्यवाह नितीन देशपांडे, प्रशासकीय अधिकारी शिल्पा पोफळे उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी माध्यम, विचारसरणी आणि त्याचे काळानुरूप गणित समजावून सांगितले. ते म्हणाले, माध्यम क्षेत्रात स्वतःची शैली विकसित करत स्वतःचे प्रेक्षक तयार करायला हवेत. माध्यमकर्मींनी 'स्टोरी टेलर' नाही, तर 'स्टोरी चेंजर' बनायला हवे. महिलांनी स्वतः च्या क्षमता ओळखत धारिष्ट्य वाढविण्याचा प्रयत्न करायला हवे.

यावेळी केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, कार्यक्रम प्रमुख ज्येष्ठ पत्रकार प्रतिभा चंद्रन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक डॉ. रवींद्र वंजारवाडकर, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सह कार्यवाह महेश करपे, प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री आदि उपस्थित होते.

संमेलनात दुपारी 'माध्यमातील मी' या परिसंवादात प्रा. डॉ. उज्ज्वला बर्वे, सकाळच्या सहयोगी संपादक मृणालिनी नानिवडेकर, एबीपी माझा वृत्तवाहिनीच्या संपादिका सरिता कौशिक, आर. जे. शोनाली यांनी आपले अनुभव मांडले. संवाद सत्राचे समन्वय साप्ताहिक विवेकच्या संपादक अश्विनी मयेकर यांनी केले.

कृत्रिम प्रज्ञेचा माध्यम क्षेत्रातील वापरावर प्रा. प्रांजली देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी केंद्राच्या संपादक अंजली तागडे व्यासपीठावर उपस्थित होत्या. पश्चिम महाराष्ट्रातील १०० हून अधिक महिला माध्यमकर्मी या संमेलनास उपस्थित होत्या.

## मुंबईत दोन कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

मुंबई : मुंबई पोलिसांच्या अंमलीपदार्थ विरोधी पथकाने विदेशातून विमानाने तस्करी करुन शहरात आणलेला सुमारे दोन कोटी रुपयांचा हायड्रोपोनिक गांजा (वीड) जप्त केला. या प्रकरणात पोलिसांनी ३७ वर्षांच्या वीरू ठाकूर याला अटक केली आहे. अंमलीपदार्थ विरोधी पथकाच्या घाटकोपर कक्षाला अंधेरीच्या लोखंडवाला परिसरात हायड्रोपोनिक गांजाची मोठी खेप उतरल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच सापळा रचून पोलिसांनी विदेशी गांजाची तस्करी



करणाऱ्या वीरू ठाकूर याला अटक केली. त्याच्याकडे सुमारे दोन किलो गांजाचा साठा सापडला. हा साठा बँकॉक, मलेशिया, थायलंड या देशातून आलेल्या प्रवाशांमार्फत तस्करी करुन भारतात आणला होता. प्रवाशांनी सामानात लपवून प्रामुख्याने कॉर्नफ्लेक्सच्या डब्यांमध्ये दडवून गांजा विमानातून मुंबईत आणला होता.

वांद्रे, खार, सांताक्रूझ, विलेपार्ले, ओशिवरा या भागातील श्रीमंत, उद्योगपती, व्यावसायिकांची तरुण मुले, बॉलीवूडमध्ये कार्यरत मंडळी यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी हा गांजा मुंबईत आणण्यात आला होता. वीरू ठाकूरच्या संपर्कातील व्यक्तींची माहिती समोर येताच भरपूर माहिती उघड होण्याची शक्यता आहे.

हायड्रोपोनिक गांजा

हायड्रोपोनिक गांजा हा उच्च प्रतीचा गांजा आहे. इतर प्रकारांपेक्षा हा गांजा तुलनेने महाग असल्याने श्रीमंत, उच्चभ्रू वर्गामध्ये याला मागणी आहे. विदेशातून तस्करी करुन मुंबईत हा गांजा आणण्यासाठी मोठी साखळी कार्यरत असावी असा पोलिसांचा अंदाज आहे. यामुळे तस्करी करणाऱ्या संपूर्ण यंत्रणेची माहिती मिळवून कारवाई करण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘डी. एम.’च्या वतीने १२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंताचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
अवंती नगर येथील डी.एम. ज्युनिअर कॉलेज चा महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या १२ वी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल ९६% लागला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कॉलेजची यशाची परंपरा कायम राहिली आहे.

कॉलेज मधील विज्ञान शाखेचा निकाल ९६% लागला असून विज्ञान शाखेतून सर्वप्रथम कानडे गौरवी (८०%) व देशमुख अनुष्का (८०%) तर द्वितीय नार्वेकर ओम (७५%) आणि तृतीय पाटील श्रीवर्धन (७४%) व वाणिज्य शाखेचा ९४% निकाल लागला असून वाणिज्य शाखेतून सर्वप्रथम रोंगे चैतन्या (८१%), द्वितीय अवधूत साक्षी (७०%), तृतीय कोमटवाड माऊली (६६%) व कला शाखेचा निकाल ६०% लागला असून कला शाखेतून सर्वप्रथम चव्हाण निकिता (६५%), द्वितीय कांबळे अंकिता (५९%), आणि बस्तापुरे निकिता (५७%) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

कॉलेज मधील सर्व यशस्वी व गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे संस्था सचिव कालिदास माने यांच्या शुभहस्ते तर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने , विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री विवेक माने व प्राचार्य चव्हाण एस.एस. यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. यावेळी कॉलेज मधून प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विध्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

या प्रसंगी माने यांनी मनोगत व्यक्त करताना विध्यार्थ्यांच्या व पालकाचे अभिनंदन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## शिक्षकांच्या जात प्रमाणपत्रांचे खुलासे मागासवर्गीय कक्षाकडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
जिल्हा परिषदेच्या पावणेदोनशे शिक्षकांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र न दिल्याने तत्कालिन सीईओंनी वेतन स्थगितीचा इशारा दिला होता. तद्नंतर दहा-बारा शिक्षकांनी प्रमाणपत्र दिले. उर्वरित, शिक्षकांनी खुलासे आणि न्यायालयात दाद मागण्याचा प्रयत्न चालविला आहे. ज्या शिक्षकांनी खुलासे दिले ते छत्रपती संभाजीनगरातील विभागीय आयुक्त कार्यालयातल्या मागासवर्गीय कक्षाकडे पाठविल्याची माहिती उपशिक्षणाधिकारी (प्रा.) प्रमोद पवार यांनी दिली.
सध्या विभागीय आयुक्त कार्यालयाकडे बिंदूनामावलीचे काम सुरू असून, बीड, नांदेडनंतर लातूर जिल्ह्याची बिंदूनामावली होणार आहे. बिंदूनामावलीवेळी लातूरच्या प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना बोलावून शिक्षकांच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रासंबंधी प्राप्त खुलाशांवर विचारणा केली जाईल. बिंदूनामावली तयार करतेवेळी या शिक्षकांच्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रांचा विषय समोर येणार आहे. या शिक्षकांना बिंदूनामावलीत कोणत्या प्रवर्गात बसवायचे, हे विभागीय आयुक्त कार्यालयास निश्चित करावे लागणार आहे.

## कृषी विभागाची खरीप हंगामपूर्व जिल्हास्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
गेल्या काही दिवसांपासून कृषी विभागात खरीप हंगामाची लगबग सुरु झाली आहे. गावस्तरावर कार्यशाळा होत असून पेरणी ते पीक काढणी इथपर्यंतचे मार्गदर्शन केले जात आहे. त्याच अनुषंगाने कृषी निविष्ठा विक्रेते खरीप हंगाम पूर्व जिल्हास्तरीय कार्यशाळा जि.प.च्या स्थायी सभागृहात पार पडली. बी-बियाणाचे आणि खताचे नियोजन कसे करावे याबाबत बैठकीत चर्चा झाली.
खरीप हंगाम पूर्व जिल्हास्तरीय कार्यशाळा ही जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी आर.टी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी कृषी आयुक्तालयातील राज्य गुणवत्ता निरीक्षक डॉ. रामचंद्र धायगुडे उपस्थित होते. बियाणे तसेच खतांचा पुरवठा याबाबत चर्चा झाली तर टंचाई भासली तर नेमके काय करावे याबाबतही वरीष्ठांनी मार्गदर्शन केले. यावेळी जि.प.चे कृषी विकास अधिकारी दिपक सुपेकर, बीज प्रमाणीकरण कृषी अधिकारी संजय शिंदे, प्रवीण गायके, श्रेयस यादव जिल्हा गुणवत्ता निरीक्षक संतोष लाळगे आदी उपस्थित होते.

## कारच्या धडकेत एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ११ एप्रिल -**
चाकूर तालुक्यातील गांजूर येथील फिर्यादी हरिबा रघुनाथ जवणे हे फोनवर बोलत थांबले होते. तेव्हा (एमएच ४६ बीओ २१२४) क्रमांकाच्या कारचालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवून फिर्यादीस जोराची धडक दिली. त्यात ते जखमी झाले. या अपघातानंतर कारचालक कुठलीही माहिती न देता पसार झाला. याप्रकरणी हरिबा जवणे यांच्या फिर्यादीवरून चाकूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## घरात घुसून मूक विवाहितेवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ११ एप्रिल -**
शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावामध्ये सकाळी ९ वाजता एक मूक विवाहिता घरात एकटी असल्याचे पाहून गावातील दोघे नराधम तिच्या घरात घुसले. यातील एका तरुणाने तिच्या दारात चौकीदारी केली तर एका नराधमाने तिच्यावर अत्याचार केल्याची हृदयद्रावक घटना घडली.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील एका गावामध्ये घरातील पुरुष कामानिमित्त सकाळी घराबाहेर पडला. घरामध्ये मूक विवाहिता एकटीच होती. हे पाहून गावातील दोघे तरुण सकाळी ९ वाजता पाणी पिण्याचा बहाणा करून त्या मूक विवाहितेच्या घरात घुसले. त्या दोघापैकी एकजण त्या विवाहितेच्या दारामध्ये चौकीदारी करीत थांबला तर दुसऱ्या नराधमाने तिला त्या विवाहितेला धमकी देत अत्याचार केला. या प्रकरणी गुन्हा नोंद झाला आहे.

## चाकुरात गाडीसह दोन लाखांचा गुटखा पकडला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
चाकूर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने शनिवारी सकाळी ६.४० वा. च्या सुमारास येथील उजळंब रोडवर कारमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा चोरटी विक्री व्यवसाय करण्यासाठी घेवुन जाताना छापा टाकून पकडला आहे.

गाडी व सुगंधित तंबाखु, गुटखा मिळून दोन लाख सत्तर हजार दोनशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलिसात दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकातील पो.हे.कॉ. सिराज शेख, पो.कॉ. दिपक सोनकांबळे, उत्तम हंगरगे यांनी गुप्त माहितीवरून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, पानमसाला चोरटी विक्री व्यवसाय करण्यासाठी मारूती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर कार क्र.एम.एच. ०३ बी.सी. ५४५२ मध्ये घेवुन जात असताना येथील उजळंब रोडवर छापा टाकून पकडला. कारमधील विमल पानमसाला व तंबाखु किंमत ७० हजार दोनशे रुपयाचा गुटखा व कार किंमत दोन लाख रुपये असा दोन लाख सत्तर हजार दोनशे रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पो.कॉ. दिपक सोनकांबळे यांच्या फिर्यादीवरून कैलास गोलावार व दिगंबर धोंडगे यांच्याविरुध्द गु.र.न.२१९/२५ कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५), सह कलम ५९ अन्न सुरक्षा व मानके अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास अशोक अनंत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज निळकंठे हे करीत आहेत.



वैशाखातील रखरखत्या उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत आहे तर दुसरीकडे शहरातील एमआयडीसी परिसरातील फुललेला हा मनमोहक गुलमोहर नजरेत गारवा भरत आहे.

## तरुणाची आत्महत्या; खून केल्याचा नातेवाईकांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
तरुणाने आत्महत्याचा केल्याचा प्रकार जळकोट तालुक्यातील डोंगरगाव येथे उघडकीस आला. दरम्यान, मारहाण करून मुलाचा खून करण्यात आला असून, यातील आरोपींविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

जळकोट तालुक्यातील डोंगरगाव येथील गिरजाबाई नारायण देवकत्ते यांनी दिलेल्या तक्रार अर्जामध्ये म्हटले आहे, मुलगा जनार्दन हा रात्री १ वाजेच्या सुमारास घरासमोर झोपी गेला होता. दरम्यान, काहीजण तेथे आले आणि मुलाला झोपीतच मारहाण करू लागले. त्यावेळी पती नारायण देवकत्ते, मुलगा मारोती, सुनील बाबूराव बिराजदार यांनी सोडवासोडव केली. त्यावेळी मी माझ्या मुलाला का मारता? अशी विचारणा केली. त्यावेळी आरोपींनी आम्ही याला सोडणार नाही, असे म्हणून निघून गेले. त्यानंतर ४ मे रोजी सकाळी घराजवळील झाडाला मुलाचा मृतदेह लटकल्याचे आढळून आले.

त्याच्या अंगावर मारहाणीचे व्रण दिसून येत होते. रात्री मारहाण केलेल्या लोकांनीच माझ्या मुलाचा खून करून, मृतदेह झाडाला लटकवला, असा आरोप करत आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## विद्यार्थ्यांकडून दहा हजार बीज गोळ्यांची निर्मिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी माझी वसुंधरा अभियान राबविण्यात येत आहे. याच अंतर्गत निलंगा तालुक्यातील तांबरवाडी येथील पहिली ते पाचवीपर्यंतच्या ३० विद्यार्थ्यांनी दोन दिवसांत दहा हजार सीड बॉल म्हणजेच बीज गोळ्यांची निर्मिती केली आहे. येत्या पावसाळ्यात यातून पर्यावरण समतोल राखण्यासाठी फायदा होणार आहे.

गेल्या काही वर्षामध्ये तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्गाचे संतुलन बिघडले असून, समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्याने यावर्षीचा उन्हाळा जानेवारी ते



मे महिन्यापर्यंत एकदम कडक, प्रखर तीव्रतेचा एक ते दोन अंशाने अधिक वाढीव तापमानाचा जात आहे. यासाठी वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. मराठवाड्यातील तापमानाचा पारा सातत्याने यावर्षी ४० अंश पार करत प्रखर तीव्रतेचा जाणवला. निलंगा तालुक्यातील औराद परिसरातील तापमानाचा पारा ४३ अंशांवर पोहचला आहे. निसर्गाचे समतोल राखण्यासाठी निलंगा तालुक्याचे गटविकास अधिकारी सोपान आकेले यांच्या संकल्पनेतून तांबरवाडी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी दहा हजार बीज गोळे तयार केले आहेत. शाळेच्या विद्यार्थी, शिक्षकांनी यापूर्वी अनेक उपक्रम राबविले आहेत. आता तयार करण्यात आलेले बीजगोळे पावसाळ्यात नदी, नाले, ओढ्याकाठी टाकले जाणार आहेत.



## आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत राजकुमार कलमे भाजपात स्वगृही परतले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आणि धडाडीचे कार्यकर्ते राजकुमार कलमे यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टीत पुन्हा प्रवेश करून स्वगृही परतले आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून गेल्या काही वर्षापासून मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजकुमार कलमे यांनी शनिवारी सकाळी भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत भाजपात पुन्हा प्रवेश केला आहे.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे नवनाथ भोसले, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, सतीष आंबेकर, प्रकाश पाटील, चंद्रभान जाधव, पद्माकर चिंचोलकर, नानासाहेब कसपटे यांच्यासह अनेक जण होते.

## डॉ. चाकूरकर यांच्या प्रयत्नाना यश : पोलीसांनी केली कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
बडूर गावचे रहिवासी असलेल्या कै गुरुलिंग हासुरे गुरुजींचा काही दिवसापूर्वी निर्घुण खून करण्यात आला होता त्या मधील आरोपी फरार होते त्यांना तात्काळ अटक करावी आणि हासुरे कुटुंबीय व गावकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी घेऊन सर्व गावकरी उपोषण साठी बसले होते याठिकाणी भाजपा नेत्या डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भेट देऊन शब्द दिला की लवकरात लवकर सगळे आरोपी अटक होतील त्यासाठी मी प्रयत्न करेन अन् त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे पोलिसांनी कारवाई केली आहे.

दि. २६ एप्रिल रोजी औंढा ता. निलंगा येथील जमावाने केलेल्या मारहाणीत बडूर येथील शिक्षक गुरुलिंग हासूरे यांची दुर्दैवी हत्या झाली होती.हा हत्या



प्रकरणतील सर्व आरोपीना अटक व्हावी व हासूरे कुटुंबियांना न्याय मिळावा यासाठी बडूर ग्रामस्थांनी दि. २ मे पासून गावात साखळी उपोषण सुरुवात केले होते. दि. ८ मे रोजी डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी उपोषण स्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या व हासूरे कुटुंबाच्या भावना जाणून घेतल्या. गावात भेट दिल्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य समजून घेत या घटनेची सर्व माहिती त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांना दिली तसेच याचं संदर्भात नांदेड परीक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्यासोबत बोलून सदरील घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगितले असता त्यांनी तपासाची चक्रे फिरवत अवघ्या २४ तासात राहिलेल्या दोन आरोपीना शोधून परराज्यातून अटक केली.

बडूर ग्रामस्थांच्या मागण्यापैकी पहिली मागणी या घटनेतील सर्व आरोपीना अटक झाली म्हणून सर्व ग्रामस्थांनी डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांचे आभार मानले आहेत.

## रेल्वे स्थानकावर पोलीसांचे ‘मॉक ड्रील’



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
लातूर रेल्वेस्थानकात शनिवारी दुपारी अक्षरशः हल्लासदृश्य परिस्थिती पाहायला मिळाली. अचानक पोलीस, कमांडो, श्वानपथक तिथे आले. ते शोधाशोध करू लागले. हे चित्र पाहून उपस्थित प्रवाश्यांसह नागरिक भांबावून गेले. रेल्वेस्थानकावर हल्ला झाल्याचा भास सर्वांना झाला.

मात्र, हा काही प्रत्यक्ष हल्ला नव्हता तर युध्दाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाकडून मॉक ड्रील करण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात युध्दाचे भडके उडत आहेत. नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, रविवारी दुपारी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या नेतृत्वात पोलीस दलाच्या वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी, कमांडो यांनी लातूर रेल्वेस्थानकावर मॉक ड्रील करून परिस्थिती हाताळली. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांसह महसूल विभागाचे अधिकारीही उपस्थित होते.

युध्दाच्या पार्श्वभूमीवर अशा एखाद्या सार्वजनिक ठिकाणी अचानक हल्ला झाल्यानंतर त्याला प्रतिउत्तर कसे दिले जाते, याचे हे प्रात्याक्षिक अर्थात मॉक ड्रील झाले. सदर प्रत्यक्ष हल्ला नव्हे तर मॉक ड्रील असल्याची खात्री पटल्यानंतर प्रवाशांसह नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

## जैवतंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शेती हे कृषि क्षेत्राचे भविष्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -**
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर येथे कृषि शिक्षण आणि संशोधनातील सध्याचा कल आणि संधी या विषयावर विचारमंथन करिता विद्यार्थी समुपदेशन व रोजगार कक्ष यांचे वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू मा. डॉ. इंद्र मणि, मार्गदर्शक म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख व माजी कुलगुरू डॉ. विलास भाले तर प्रमुख अतिथी म्हणून संचालक शिक्षण डॉ. भगवान आसेवार, संचालक विस्तार डॉ. राकेश अहिरे, माजी कुलसचिव डॉ. दिगंबर चव्हाण व अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती.



डॉ. इंद्र मणि अध्यक्षीय समारोपात म्हणाले कि, हवामान बदलाच्या परिस्थितीतही अन्नसुरक्षेकरिता व शाश्वत कृषि विकासासाठी जैवतंत्रज्ञान आधारित कीड रोग प्रतिबंधक, जनुकीय सुधारित ताण सहन करणारे वाण, लवकर परिपक्व होणारे व कोणत्याही तापमानास तग धरणारे पिकांचे वाण, अजैविक ताण प्रतिबंधक पिक वाणांच्या वापरामुळे उत्पादन वाढ शक्य होईल.

जैवतंत्रज्ञानास कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाची जोड देवून कृषि क्षेत्रात हवामान बदलाचे विपरीत परिणाम कमी करता येतील.

डॉ. शरद गडाख यांनी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून जैवतंत्रज्ञान क्षेत्रात व्यवसाय करण्यासाठी उपलब्ध पर्यायाबाबत मार्गदर्शन केले. जैवतंत्रज्ञान व्यवसायातील संधी व रोजगार, कंपन्यांना अनुवांशिक चाचण्या (जेनेटीक टेस्टिग) आणि संबंधित सेवा पुरवणे, उद्योग क्षेत्रात जैवतंत्रज्ञान संबंधित सल्लागार म्हणून काम करणे, जैवतंत्रज्ञान शास्त्रज्ञ व पिक पैदासकार यांच्या समन्वयातून विविध पिकांचे वाण विकसित करणे ई. विषयावर मागदर्शन केले.

डॉ. विलास भाले याबाबत म्हणाले, कृषितील नवीन शैक्षणिक धोरण कृषि विकासात उपयोगी शेतकरी व कृषि संशोधन याच्या प्राधान्याबरोबर कृषि व्यापार व उद्योग यात लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करणे ई. करिता राबविण्यात आले आहे. यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

रोखठोक

# वेव्हज : 'गेम चेंजर' देशाची नवी कहाणी!

दिनेश गुणे

कोणताही कसोटीचा काळ कठीणच असतो. मग ती युद्धस्थिती असो, वा महामारीसारखे भीषण संकट असो. या काळात समाजमन काहीसे संभ्रमित असते, कानावर आदळणाऱ्या वेगवेगळ्या, कधीकधी अनधिकृतपणे तर कधी जाणीवपूर्वक पसरविल्या जाणाऱ्या बातम्या किंवा माहितीमुळे नेमके खरे काय याची खात्री होत नसल्याने संशयग्रस्तही असते. अशा काळात, समाजाला किंवा प्रत्येक व्यक्तीला आश्वस्तपणे व्यस्त राहण्याची संधी शोधणे हे एक आव्हान असते आणि एखाद्या क्षुल्लक विचारातून त्या आव्हानाची बीजे अंकुरतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एक चिंतनशील व्यक्तिमत्त्व आहे आणि सर्वसामान्य माणसे सहसा ज्या गोष्टींचा गांभीर्याने सखोल विचार करत नाहीत, त्या गोष्टींवर ते सातत्याने चिंतन करत असतात, ही बाब नाकारता येत नाही. गेल्या दहा वर्षांत त्यांनी भारतीय समाजासमोर मांडलेल्या अनेक मुद्द्यांतून त्यांच्या चिंतनशील वृत्तीचे पुरावे स्पष्ट झाले आहेत. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरच्या आपल्या पहिल्याच प्रकट चिंतनात त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करणारा संदेश एका महत्त्वाच्या मंचावरून दिला, तेव्हा अनेकांच्या भुवया काहीशा उंचावल्या होत्या. पंतप्रधानपदासारख्या श्रेष्ठ पदावरील व्यक्तीने स्वच्छतेसारख्या बाबीला एवढे राष्ट्रीय महत्त्व द्यावे, याचे अनेकांस आश्चर्य वाटले होते, पण त्यांच्या त्या संदेशातून 'स्वच्छ भारत' नावाची शासकीय स्तरावरील एक मोहीम सुरू झाली आणि बघता बघता देशात त्याचे चळवळीत रूपांतरही झाले. मोदी यांनी पहिल्यांदा स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले तेव्हा कदाचित त्याचे भविष्य फारसे कोणास उमगले नसावे. अशाच चिंतनशील स्वभावातून सुमारे पाच वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेल्या विचाराची बीजे आता देशात रुजली आहेत, एवढेच नव्हे, तर त्याचे वृक्षात रूपांतरही झाले आहे. आज मागे वळून पाहताना, हे अविश्वसनीय वाटेल, पण ते खरे आहे....

भारत हा कहाण्यांचा देश आहे. यातीलच एक असलेल्या या गोष्टीला सुमारे आठ हजार वर्षांचा इतिहास आहे. त्या काळी, म्हणजे सिंधू संस्कृतीच्या काळात भारतात एक नवा शोध लागला होता. पूर्वी कोण्या काळी शोध लागण्याचा वेग अत्यंत मंद होता. कित्येक दशकांच्या अथक संशोधनानंतर, चिंतनातून एखाद्या गरजेचा तोडगा काढण्याची प्रक्रिया सुरू व्हायची आणि जसजशी गरज तीव्र होत जाईल, तसतसा ती भागविण्याचा मार्ग शोधण्यासाठी धडपड सुरू व्हायची. कारण, गरज हीच शोधाची जननी असते, असाच त्या काळी समाजाचा समज होता. त्यामुळे गरजांची तीव्रता वाढण्याचा वेगच मुळात कमी असल्याने त्या भागविण्यासाठी नवनवे शोध लागण्याची गरजही फारशी वेगवान झाली नव्हती. अशा काळाच्याही आधी, आठ हजार वर्षांपूर्वी भारतात खेळणी नावाचा एक प्रकार जन्माला आला. तेव्हाच्या अप्रगत काळात, कदाचित जन्मदात्या मातापित्यांना उदरनिर्वाहासाठी रात्रंदिवस भटकंती करणे भाग पडत असेल, शिकार किंवा रानोमाळ पसरलेल्या निसर्गातून पोषणमूल्ये असलेले अन्न शोधण्यासाठी वणवण करताना, कुटुंबातील लहान मुलांचा सांभाळ करणे सर्वांना शक्य होत नसेल. अशा वेळी, मुलांनी स्वतःच आश्वस्तपणे घरी थांबावे आणि त्या काळात त्यांना एकटेपणा जाणवू नये याकरिता काही चिंतनशील मनांनी खेळण्यांचा शोध लावला असावा. दोरीला धरून सरसर उतरणाऱ्या माकडाची लाकडी प्रतिकृती खेळण्याच्या रूपाने पहिल्यांदा एका मुलाच्या हातात आली, तेव्हा त्याच्या डोळ्यात उमटलेली आनंदाची चमक किती तेजस्वी असेल, याची आज आपण कल्पना करू शकत नाही. खेळणे नावाच्या प्रकाराचा तो पहिला शोध ही मानवी जीवनशैलीतील क्रांतीच्या पर्वाचे पहिले पाऊल ठरले आणि पुढे खेळण्यांच्या विश्वात मुलांना रमविण्यासाठी नवनव्या शोधांची मालिका सुरू झाली. प्राणी, पक्ष्यांच्या आकाराची लाकडी खेळणी, शेती किंवा संसारोपयोगी वस्तूंची ओळख करून देणारी खेळणी, चाकाच्या गाड्या, अशा टप्प्याने खेळण्यांच्या क्षेत्राची घोडदौड सुरू झाली. बांबू, गवत, लाकूड, माती, कापड, अशा साधनांच्या टप्प्याने खेळण्यांचे विश्व विस्तारत गेले आणि आजच्या प्रगत युगात खेळण्यांच्या बाजारपेठेने अब्जावधींच्या उद्योगापर्यंत मजल मारली.

इतिहासाचा मागोवा घेतल्याखेरीज या वाटचालीचे महत्त्व लक्षात येणार नाही, हे खरेच असले, तरी असा मागोवा घेण्याकरितादेखील काहीतरी निमित्त घडावे लागते. पाच वर्षांपूर्वी, जगावर कोविड नावाच्या महामारीचे संकट आले आणि समूहप्रिय माणसास अलगपणे राहणे भाग पडू लागले. घरबसल्या सारे व्यवहार पार पाडण्याची कसोटी सुरू झाली आणि जीवनशैलीचा बाजच बदलून गेल्याने, अशा अस्वस्थ, सुरक्षित काळात काय करावे या विचाराने अनेकजण सैरभैरही झाले. सर्वांत मानसिक हाल मुलांचे होत होते. मैदानावर, घराबाहेर एकत्र जमून खेळण्याबागडण्याच्या दिवसांत घरातच बसून राहावयाची वेळ मुलांवर आली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चिंतनास हा मुद्दा सापडला. 'मन की बात' नावाच्या प्रकट चिंतनातून त्यांनी या मुद्द्याचे महत्त्व समाजात रुजविण्याचा पहिला प्रयत्न केला. ३० ऑगस्ट २०२० या दिवशी पंतप्रधानांची 'मन की बात' घराघरात पोहोचली आणि कठीण काळात मुलांच्या हाती खेळणी मिळाल्यास त्यांना संकटाचा सामना करण्याचे मानसिक बळ लाभेल हा पंतप्रधानांचा विश्वास हजारो मनांना दिलासा देऊन गेला.

महामारीच्या इतक्या दीर्घ काळात घरामध्ये राहून मुले आपला वेळ कसा घालवत असतील, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पंतप्रधानांनी चिंतन सुरू केले आणि गांधीनगरच्या 'चिल्ड्रेन युनिव्हर्सिटी'त मुलांच्या



मनोविकासासाठी सुरू असलेल्या अनेक आगळ्यावेगळ्या प्रयोगांतून काही उत्तर शोधता येईल हे त्यांनी ओळखले. भारत सरकारचे महिला बालविकास मंत्रालय, शिक्षण मंत्रालय, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय यांना एकत्र घेऊन मोदी यांनी मुलांसाठी काही वेगळे करता येईल का यावर विचार सुरू केला आणि उत्तर, उपाय सापडत गेला. मुलांच्या हाती नवनवी खेळणी दिली तर त्यांना हा कठीण काळ घालविणे अवघड राहणार नाही, हा विचार पंतप्रधानांनी मांडला. भारतातल्या मुलांना नवनवीन खेळणी कशी मिळू शकतील, खेळणी उत्पादनाच्या क्षेत्रात भारत हे केंद्र कसे बनू शकेल, यावर विचारमंथन सुरू झाले.

कोणतेही खेळणे हे मुलांची ॲक्टिव्हिटी वाढवणारे असते, तसेच ते आपल्या आकांक्षांना पंख लावणारेही असते. खेळणे हे केवळ मन रमवणारे किरकोळ साधन नाही. एखाद्या खेळण्यामुळे मनाचे पोषण होते. जे खेळणे अपूर्ण आहे, ते सर्वांत चांगले, उत्कृष्ट खेळणे असते. कोणतेही खेळणे खेळत खेळत पूर्ण करण्याने बुद्धीचा विकास होतो, ही बाब मोदी यांच्या मनात घर करून राहिली होती आणि बुद्धीला चालना देणाऱ्या खेळण्यांची निर्मिती देशात करण्याचा आग्रह त्यांनी धरला. मुलांच्या सर्जनशीलतेला वाव देणाऱ्या, जीवनातील वेगवेगळ्या पैलूंवर प्रभाव टाकणाऱ्या बाबी खेळण्यांच्या माध्यमातून आणता आल्या पाहिजेत, हा विचार पुढे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा भाग झाल्या आणि त्यातूनच, खेळता खेळता शिकणे, खेळणी बनविण्यास शिकणे, ज्या ठिकाणी खेळणी बनवली जातात, त्या स्थानांना भेट देणे, या सर्व गोष्टींचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात आला. देशातील प्रतिभावंत आणि कुशल कारागिरांना खेळणी बनविण्याच्या उद्योगात सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी टॉय क्लस्टर, म्हणजे खेळणी बनविण्याची केंद्रे म्हणून विकसित करण्याची कल्पना पुढे आली. कर्नाटकच्या रामनगरममध्ये चन्नापटना, आंध्र प्रदेशात कोंडापल्ली, तामिळनाडूतील तंजौर, आसामातील धुबरी, उत्तर प्रदेशात वाराणसी, अशी अनेक ठिकाणे निश्चित करण्यात आली.

जागतिक स्तरावर खेळणी उद्योगाची उलाढाल सात लाख कोटींपेक्षाही जास्त आहे, पण ज्या देशाकडे इतकी समृद्ध परंपरा आहे, विविधता आहे, युवा लोकसंख्या आहे, तरीही खेळण्यांच्या बाजारपेठेत आपली भागीदारी कमी आहे, ही गोष्ट पंतप्रधान मोदी यांनाच खटकत होती... कदाचित यातूनच, खेळण्यांच्या बाजारपेठेतील स्पर्धेत उतरण्याची भारताची महत्त्वाकांक्षा जागी झाली. खेळणी बनविण्याच्या क्षेत्रात उतरून आपण आपला गौरवशाली भूतकाळ पुन्हा एकदा वर्तमानात आणू शकतो आणि त्यातून आपले स्वर्णिम भविष्यही निर्माण करू शकतो, हा विश्वास मोदी यांनी दिला आणि स्टार्ट अप उद्योगक्षेत्राला आवाहन केले... 'टीम अप फॉर टॉईज'- चला, सर्वजण मिळून खेळणी बनवू या! आता 'लोकल' म्हणजे, स्थानिक खेळांसाठी व्होकल होण्याचा हा काळ आहे... मुलांसाठी नवीन प्रकारची, पर्यावरणाला अनुकूल असतील अशी, उत्तम दर्जाची खेळणी आपण बनवू या. यातून मुलांचे बालपण समृद्ध होऊन ते अधिक उमलून येईल...

आता संगणक आणि स्मार्टफोनच्या युगात कॉम्प्युटर गेम्स लोकप्रिय आहेत. हे खेळ मुलांबरोबर प्रौढांनाही आवडतात. या खेळांना देशांतर्गत कल्पना, संकल्पनांचा साज दिला, आपल्या या समृद्ध इतिहासाचे कोंदण चढविले, तर संगणक क्षेत्रांतील या खेळांच्या उद्योगात आपण आघाडी घेऊ शकतो, हे लक्षात घेऊन 'आत्मनिर्भर भारत' अभियानामध्ये आभासी खेळांच्या निर्मिती क्षेत्रातील संधीचा फायदा घेण्यासाठी प्रतिभाशाली युवाशक्तीच्या सर्जनशीलतेला मोदी यांनी साद घातली. आपल्या एकत्रित प्रयत्नांतून अशा उद्योगांत उभे राहणारे आजचे लहानलहान स्टार्ट अप्स उद्या मोठमोठ्या कंपन्यांमध्ये रूपांतरित होतील आणि जगात भारताची नवी ओळख निर्माण होईल, असा नवा आत्मविश्वास दिला.

... आज पाच वर्षांनंतर मागे वळून पाहताना, एका नव्या क्रांतीच्या जन्माची कथाबीजे कशी रुजली त्याचा अनुभव घेता येतो. पाच वर्षांपूर्वी, एका संकटाच्या काळात मुलांची मने रमविण्यासाठी काय करता येईल याच्या चिंतनातून स्वप्नवत वाटणाऱ्या एका प्रवासाची सुरुवात होऊन पुढच्या पाच वर्षांत ते वास्तवातही आले. गेल्याच आठवड्यात मुंबईमध्ये संपन्न झालेल्या 'वेव्हज-२०२५' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील एका परिषदेत भारताच्या या भरारीचे पुरावे उघड झाले आहेत. 'मन की बात'सारख्या कार्यक्रमातून व्यक्त केलेला एक विचार, त्याचा पाठपुरावा करत, पुढच्याच वर्षी, सन २०२१ मध्ये केंद्र सरकारने आयोजित केलेल्या 'द इंडियन टॉय फेअर' उपक्रमातून भारतीय इतिहास, संस्कृती, पौराणिक कथा आणि नीतिमत्तेवर आधारित 'टॉय ॲण्ड गेम्स' ही संकल्पना मांडण्याकरिता सर्जनशील मनांना केलेले आवाहन आणि लगेचच खेळांच्या जगातील या विश्वातील पदार्पणाचे पहिले पाऊल हा टप्पा म्हणजे गेम चेंजर वाटचालीची कहाणीच आहे. या कहाणीनेच चीनमधून होणाऱ्या खेळण्यांच्या आयातीस मागे टाकले आणि भारतातून खेळण्यांची निर्यात होऊ लागली.

गेल्या दहा वर्षांत खेळणी निर्यातीत अडीचशे टक्क्यांनी झालेली वाढ हा त्या स्वप्नपूर्तीचा स्पष्ट पुरावा ठरला आहे. जगभरातील मोठ्या खेळणी कंपन्या आज चीनऐवजी भारतात तयार झालेल्या खेळण्यांना पहिली पसंती देऊ लागल्या आहेत. येत्या आठ वर्षांत खेळण्यांच्या बाजारपेठेतील भारतीय उद्योगाची उलाढाल ४.४० अब्ज डॉलर्सचा टप्पा गाठेल असा अंदाज व्यक्त होत आहे. भारत हा या क्षेत्रातील 'गेम चेंजर', 'पॉवर हाऊस' म्हणून पुढे आला असून, जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन (वेव्हज) २०२५ या पहिल्याच जागतिक शिखर परिषदेचे यजमानपद मिळवून या क्रांतिपर्वाचे पुढचे पाऊल पडले आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर, गेल्या १ मे रोजी मुंबईत भरलेल्या वेव्हज परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रांतीच्या नव्या वाटेवरचे पुढचे पाऊल टाकून भविष्याची दिशा निश्चित केली आहे. आजपर्यंत 'मेक इन इंडिया' नावाची मोहीम सरकारने राबविली. आता पुढचा टप्पा म्हणून, 'मेक इन इंडिया फॉर द वर्ल्ड' हा नवा संकल्प त्या परिषदेत सोडला गेला. खेळणी उद्योगाच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकल्यानंतरच्या पुढच्या जेमतेम पाच वर्षांत भारताने या क्षेत्राचे नेतृत्व करण्याची क्षमता सिद्ध केली आहे. देशातील सर्जनशीलता, प्रतिभा आणि कल्पकता यांना प्रोत्साहन देऊन त्यातून नवनिर्मितीच्या संधी उभ्या केल्या की काय होऊ शकते हे यातून स्पष्ट झाले आहे. ही यशाची कहाणी आहे. भारत हा कहाण्यांचा देश आहे, असे वेव्ह परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले होते. इथल्या प्रत्येक गोष्टीला कहाणी आहे. या देशातील नद्यांना कहाण्या आहेत, निसर्गाला कहाण्या आहेत, पर्वतांनाही कहाण्या आहेत आणि त्यामध्ये भारताच्या समृद्ध संस्कृतीची ओळख दडलेली आहे. आता नव्या युगासोबत भारताच्या नव्या वाटचालीच्याही नव्या कहाण्या लिहिल्या जात आहेत. खेळणी उद्योगातील क्रांतीची वाटचाल ही अशाच एका कहाणीची सुरुवात आहे आणि वेव्ह परिषदेतून भारताने सिद्ध केलेली मनोरंजन उद्योगातील नेतृत्वाची क्षमता नावाच्या एका नव्या कहाणीची बीजे वेव्ह परिषदेतून रुजू घातली आहेत. जागतिक मनोरंजन उद्योगातील नव्या संधींची क्षितिजे भारताने जगासमोर खुली केल्याने, पाच वर्षांपूर्वीच्या स्वप्नाची वास्तवापर्यंतची वाटचाल उलगडणारा एक व्यापक पट या कहाणीतून उभा राहिला आहे. ही परिषद म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रतिभा आणि सर्जनशीलतेला सामावून घेण्याच्या जागतिक परिसंस्थेचा पाया ठरेल असा विश्वास मोदी यांनी त्या परिषदेत बोलताना व्यक्त केला होता. नव्या कहाण्यांच्या शोधात असलेल्या जगाला देण्यासाठी भारताकडे भरपूर कहाण्या आहेत. आतापर्यंत भारताने भारतासाठी त्या निर्माण केल्या, आता जगाला देण्यासाठी त्यामध्ये नव्या कहाण्यांची भर घातली जात आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### युद्ध काळात ज्येष्ठांचे योगदान महत्त्वाचे

पाकिस्तानद्वारे आपल्या देशात दहशतवाद पसरविला व निष्पाप पर्यटकांचा बळी गेला. आम्ही ज्येष्ठ फिरायला जातो व देश-विदेशात भ्रमण करतो, याची झळ आपल्याला केव्हाही पोहोचू शकते व म्हणून देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना मदत करणे आमचे कर्तव्य ठरते. आपल्या गावात, शहरात व घरी राहून आम्ही ज्येष्ठ नागरिक देशाच्या संरक्षणात मदत करू शकतो व ती आपण केली पाहिजे. मॉक ड्रील, सिव्हिल डिफेन्समध्ये सहभाग घेऊन व उपस्थित राहून आपण आपले, आपले परिवाराचे, आपले देशाचे रक्षण, स्थानिक प्रशासनाला मदत करून आपल्या देशाचे रक्षण करू शकतो. याला कोठेही जायची व परिश्रम घ्यायची  गरज नाही.

जिल्हा प्रशासन व जिल्हाधिकारी यांना वय गट ६० ते ७० व ७० वरील, माजी सैनिक, सेवानिवृत्त पोलिस, होमगार्ड, अग्निशमन अधिकारी व कर्मचारी, सशक्त ज्येष्ठ नागरिक आपली नावे, ज्येष्ठ नागरिक मंडळाद्वारे पाठवा. प्रत्येक मनपा झोनमध्ये दर रविवारी मॉक ड्रील, सिव्हिल डिफेन्सची माहिती करून घ्या. जास्त परिश्रम नसणारी महत्त्वाची भूमिका आपण बजावू शकतात व आपले देशाच्या कठीण काळात सहभाग घेऊ शकतात.

काही सेवानिवृत्त सैन्य अधिकारी व देशभक्तीची आपली सेवा वयाच्या ८० व ९० नंतर देण्याची तयारी दाखविली, आम्ही सिव्हिलियन ज्येष्ठ अशी तयारी ठेवू शकतो व दर रविवारी प्रशिक्षण व माहिती घेणे शक्य आहे व देशाच्या सुरक्षेत सहभाग घेऊन देशप्रेम व्यक्त करावे, असे आवाहन, सीनियर सिटिजन कौन्सिल ऑफ नागपूर डिस्ट्रिक्टच्या वतीने आम्ही करीत आहे. दिवसभर कोणतेही फोटो मोबाईलवर पाठविणे, खोट्या बातम्या पसरविणे, असामाजिक तत्त्वांना खतपाणी घालणे, गुड मॉर्निंग, गुड नाईट मेसेज पाठविण्यात वेळ घालविण्यापेक्षा देशाकरिता प्रत्येक ज्येष्ठाला, एक रविवार देणे शक्य आहे. आम्ही स्थानिक प्रशासनाला मदत करताना पुढच्या पिढीला, आमचे नातेवाईक, नातू, पणतू यांना स्वरक्षण, सुरक्षा व युद्ध काळात सामान्य नागरिकाचे कर्तव्य व जबाबदारीची जाणीव घरबसल्या करून देणे शक्य आहे. बघ्याची भूमिका घेणे, देशाने, सैन्याने काय करावे, शासनाने काय करावे, असे सल्ले मोबाईलवर न देता, जातीयवाद, धर्माधर्मात तेढ निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन सीनियर सिव्हिल कौन्सिलतर्फे करण्यात येत आहे. आपला भारत देश, विविध भाषा, जाती, धर्म, पंथ व विविध पक्ष, संघटना, संस्कृतीने नटलेला व बहरलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेचे, देशाचे रक्षण करण्याची वेळ आली आहे व त्याचे रक्षण करणे आम्हा ज्येष्ठांचे कर्तव्य आहे.

**सुरेश रेवतकर**/९४२२८३७६५७

### अन्यथा जगाच्या नकाशावरून नष्ट व्हाल

पाकिस्तानची वाटचाल गेल्या अनेक दशकांपासून अराजक, दहशतवाद आणि अस्थिरतेच्या दिशेने चालू आहे. धर्माच्या नावावर स्थापन झालेल्या या देशाने स्वतःच्याच लोकांचा शोषण, अल्पसंख्यकांचा छळ आणि शेजारी देशांविरोधातील घृणायुक्त नीती यावर आपले राजकारण उभं केलं. मात्र आता ही खेळी उलटी ठरत आहे. आजचा पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या कोलमडलेला, राजकीयदृष्ट्या कमजोर आणि सामाजिकदृष्ट्या उद्ध्वस्त झालेला देश आहे.

जगभरातील दहशतवादी संघटनांना पाकिस्तानने दीर्घकाळ आश्रय दिला. पण आता जग बदललं आहे. दहशतवादाविरोधात सर्व देश एकत्र आले आहेत आणि पाकिस्तानच्या भूमीवरून चालणाऱ्या घातक कारवायांकडे आता नजरेआड न करता, सर्जिकल स्ट्राईक आणि आर्थिक प्रहार केले जात आहेत. भारताच्या ऑपरेशन सिंदूर आणि तत्सम कारवायांनी पाकिस्तानच्या असुरक्षिततेचे वस्त्र हरपले आहे. आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, चीन किंवा सौदी अरेबिया यांच्याकडे सतत मदतीसाठी हात पसरणाऱ्या पाकिस्तानची पत जगात संपली आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष करून दहशतवादाला चालना देणाऱ्या या व्यवस्थेचा शेवट जवळ आला आहे.

सिंध, बलुचिस्तान यासारख्या प्रांतांमध्ये स्वातंत्र्याची मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. हेच चित्र पुढे गेले तर पाकिस्तान आपोआपच तुकडे-तुकडे होण्याच्या दिशेने जाईल. एका देशाचे नकाशावरून पूर्णपणे नष्ट होणे ही कल्पना अतिशयोक्त वाटू शकते, पण पाकिस्तानच्या आंतरिक व बाह्य धोरणांनी ही शक्यता आता प्रत्यक्षात उतरू शकते. पाकिस्तानने जर आता आत्मपरीक्षण केले नाही, दहशतवादाचा मार्ग सोडून विकास आणि शांततेचा मार्ग स्वीकारला नाही, तर भविष्यात जगाच्या नकाशावरून त्याचे अस्तित्वच मिटण्याची शक्यता नाकारता येत नाही. अजून ही वेळ गेलेली नाही...

**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

### 'ऑपरेशन सिंदूर' अभिनंदनीय

काळीजविहीन दहशतवाद्यांना साथ म्हणजे आत्मघात. जगभरात शेकडो अशा विघातक विचारांच्या संघटना अस्तित्वात आहेत की त्यांना हवा असलेला उद्देश साध्य करण्यासाठी ते निष्पाप मानवांच्या नृशंसपणे हत्या करीत असतात. असे कृत्य करताना त्यांच्या मनात कुठलीही दयामाया असत नाही. या



संघटना उभारण्यामागे, त्यांना अर्थसाहाय्य, शस्त्रपुरवठा व आश्रय देण्यात काही देशांचे सरकारच जबाबदार असल्याचे आपण पाहत आहोत. संपूर्ण जगात अशांतता निर्माण करणाऱ्या या दहशतवादी संघटना व त्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करणारे सरकार अथवा विशिष्ट विचार जोपासणारे मानवी समुदाय हे पण या दहशतवाद्यांच्या रांगेतच असतात. अशा दहशतवाद्यांच्या विरोधात लढण्यासाठी सर्व सामान्यांकडे कुठलेच सामर्थ्य नसते. काहीही संबंध नसताना सर्वसामान्य जनतेची प्राणहानी, वित्तहानी, त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त करणाऱ्या या दहशतवाद्यांचे निर्दालन झालेच पाहिजे असे सर्व शांतताप्रिय नागरिकांना वाटते.

आजवर अशा प्रकारच्या दहशतवाद्यांच्या संघटनांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या हल्ल्यात लाखो लोकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. हमास या, पॅलेस्टाईन दहशतवादी संघटनेने इस्रायली नागरिकांसोबत जे अव्यवहार्य कुकर्म केले त्याचा परिणाम आज ते दहशतवादी व पॅलेस्टिनी भोगत आहेत. पहलगाम येथे पर्यटकांवरील पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना त्यांचा धर्म विचारून ठार केले. ठार मारले गेलेले भारतीय नागरिक धर्माने मुस्लिम नव्हते तर ते हिंदू, ख्रिश्चन म्हणजेच गैरमुस्लिम होते. ठार केलेल्या पुरुषांच्या बायका विधवा झाल्या. त्यांच्या लेकरांचे पितृत्व हरवले. वयोवृद्ध माता-पित्यांचे पुत्र त्यांना सोडून गेले. या घटनेची निंदा व निर्भर्त्सना करावी तेवढी कमीच आहे. आपला सुहाग हरवलेल्या स्त्रियांच्या कपाळावरील कुंकू व केसांच्या भांगातील सिंदूर हिरावले गेले. त्याचा बदला भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या हद्दीत घुसुन, 'ऑपरेशन सिंदूर'ने घेतला. दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. शेकडो दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. सरकारच्या या 'मौत का बदला मौत' या कृतीमुळे तमाम भारतीयांना समाधान लाभले आहे. भारत सरकारने आता थांबू नये. आतापर्यंत झालेल्या सर्व हल्ल्यांचा हिशेब अशीच कारवाई सुरू ठेवून पूर्ण करावा ही तमाम भारतीयांची इच्छा आहे.

**प्रा. उदय कानतोडे**/९४२३६६३७०६

### अपयशातून सकारात्मक संदेश

नुकतीच एक बातमी वाचली. नापास झालेल्या मुलाच्या पालकांनी अपयशाचा उत्सव साजरा केला. खरोखरीच जगावेगळी बातमी असली तरी त्यात एक सकारात्मक संदेश दडला आहे.जीवनात यश आणि अपयश हे येणारच. खरं तर अपयश ही यशाची पहिली पायरी आहे असे म्हणतात. अपयश या शब्दातच यश सामावलेले आहे. शालेय शिक्षण सुरू असताना कधी कमी  तर कधी अपेक्षेइतके यश मिळते . मनासारखे यश मिळाले तर त्याला सेलिब्रेट केले जाते पण यश मिळाले नाही तर सगळे घरदार सुतकी वातावरणात राहतात. मुलांनी खूप मोठी चूक केली असा भाव दिसतो. खरे तर हीच वेळ असते त्या मुलांना सावरण्याची, सांभाळण्याची आणि जे काही झाले त्यातून बाहेर काढण्याची पण ते लक्षात न घेता त्यावर आरोप-प्रत्यारोप सतत केले जातात आणि मूल घरादारापासून आपल्या लोकांपासून दुरावते. आपले कोणीच नाही ही भावना निर्माण होते. त्यातूनच नको ते पाऊल उचलले जाते. घरात समाजात जेव्हा अव्हेरले जाते तेव्हा काहीही घडू शकते. आपल्या हातून चूक घडली त्यातून पुन्हा दुसरी चूक होते आणि पश्चात्ताप होण्याखेरीज काही हाती राहत नाही. एका परीक्षेत यश मिळाले नाही तर ती चूक इतकी मोठी नाही की जीवनात कधीच यश मिळणार नाही. खरे तर अपयशातून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेणारे आपल्या आजूबाजूला बरेच असतात. ते यशाच्या शिखरावर असताना आपल्या जीवनातील अपयश देखील सांगतात. आपण त्यातून कसे बाहेर पडलो हा त्यांचा प्रवास प्रेरणा देणारा असतो. कर्नाटकमधील एका कुटुंबातील मुलाचे अपयश त्याच्या पालकांनी साजरे केले. पालकांचे मुलावर असलेले नितांत प्रेम यासाठी कारणीभूत ठरले हे निश्चित. परिश्रम करून देखील अपयश आले त्याची मेहनत खरी होती आणि म्हणून केक आणि मिठाई वाटून हा उत्सव साजरा केला गेला. मुलांचा आत्मविश्वास परत आणण्यासाठी हा एक मनापासून केलेला प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. मुले चुकतात हे खरे आहे पण पालकांनी सुद्धा चूक करू नये. विचार करावा आणि मुलांना समजून घ्यावे. ही मुले भविष्यात उंच भरारी घेतील. आयुष्यात चढ-उतार येणारच हे  निश्चित. पुन्हा पुन्हा प्रयत्न करून पुढे वाटचाल केली पाहिजे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### सुखी जीवनाचे पाच सकारात्मक विचार

आयुष्यात माणसाची सर्व धडपड सुख प्राप्त करण्यासाठी आहे. सुखप्राप्तीचा मार्ग कोणता असेल हे सांगू शकत नाही, तो नैतिकच असेल ही शाश्वती नाही. आज माणूस, मिळेल त्या मार्गाने, मिळेल त्या पद्धतीने सुख ओरबाडून घेत असल्याचे अनुभवायला येते आहे. या स्पर्धेत कोण किती यशस्वी होत आहे, हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे.आज काही जण सुख शोधण्यात मग्न आहेत. काहीजण सुखी आहोत हे दर्शवत आहे, तर काही जण सुखी असल्याचा नुसताच अभिनय करत आहे. पण सुखी असल्याचे  समाधान कुणाच्या चेहऱ्यावर ठळकपणे दिसून येत नाही.  समर्थ रामदास स्वामींना या गोष्टीचे ज्ञान ४१६ वर्षांपूर्वीच  झाले असावे, म्हणून समर्थ आपल्या श्लोकातून बोध करताना सांगतात,

जगी सर्व सुखी असा कोण आहे।
विचारी मना तुच शोधूनी पाहे ।

समर्थांनी लिहिलेला हा  श्लोक मानवी मनाला सांत्वना देतो की या विश्वात सर्वार्थाने कुणीच सुखी नाही. या जगात मी एकटाच दुःखी नाही हा विचार माणसाला काहीकाळ सुखी करून जातो याचाच अर्थ सुख माणसाच्या विचारात आहे. अनेक जण ज्या परिस्थितीत आहे त्याच परिस्थितीत मी सुद्धा आहे. हा एक मनाला सुखावणारा विचार आहे. याचाच अर्थ असा की सुख हे विचारांवर अवलंबून आहे.

मानवाच्या सुखी जीवनाचे मूलमंत्र ठरू शकतात असे पाच विचार -

१) ही पृथ्वी केवळ माझ्यासाठी परमेश्वराने निर्माण केली नसून, ती इतरांसाठी सुद्धा निर्माण केली आहे. म्हणून सर्वजन ज्या परिस्थितीत या पृथ्वीवर जीवन जगत आहेत, तसेच मला जगायचे आहे. त्यामुळे तक्रार करणे निरर्थक आहे. जर असा विचार केला तर तो सुखदायी ठरू शकतो.

२) या भूतलावर जीवनात ज्या घडामोडी इतरांसोबत घडत आहेत, त्याच माझ्यासोबत घडत आहेत आणि यापेक्षा खूप काही वेगळं घडणार नाही. त्यामुळे दुःखी होण्याचे काही कारण नाही. हा विचार सुद्धा माणसाला सुख देणारा ठरू शकतो.

३) आयुष्यात चुकूनही कधी दुसऱ्या व्यक्तीचे अनुकरण करू नये. कारण परमेश्वराने प्रत्येक व्यक्तीला विशेष गुण, रंग, रूप व स्वभाव प्रदान करून पृथ्वीवर पाठवले आहे. त्यामुळे दुसऱ्याचे अनुकरण करू नये. हा विचार सुद्धा मनाला सुख देणारा ठरू शकतो.

४) या जगात ८० टक्के समस्या केवळ आणि केवळ चुकीच्या बोलण्यामुळे आहे. त्यामुळे आपले बोलणे, वागणे हे सकारात्मक व रचनात्मक असायला हवे.

५) या पृथ्वीवर परमेश्वराने मानवाला शंभर वर्षांकरिता, पर्यटक म्हणून पाठवले आहे तेव्हा पर्यटनाचा पूर्ण आनंद घेतल्यानंतर सर्व पर्यटकांना येथून निघून जायचे आहे. कारण नवीन पर्यटकांसाठी जागा उपलब्ध करून द्यायची आहे हा निसर्गाचा न टाळता येणारा नियम आहे. म्हणून मरणाची भीती मुळीच नको. असा विचार केला तर मनाला सुख प्राप्त होऊ शकते.

असे विचार करून जर आपण आयुष्याला सामोरे जात असेल तर जीवनात दुःखाला मोठे स्थान उरणार नाही व मानवी जीवन उत्तम विचाराने सुखी होईल.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

### भगवान नृसिंह अवतार म्हणजे धर्माचा अधर्मावर विजय!

भगवान विष्णूचा प्रत्येक अवतार हा दुष्ट प्रवृत्तींचा नाश करण्यासाठीच असतो. ११ मे रोजी भगवान विष्णूच्या चौथ्या



अवताराची नृसिंह जयंती आहे. हिरण्यकश्यपूला वाटायचं, मीच ईश्वर आहे, सर्वांनी माझंच नाव घ्यावं. पण त्याचाच मुलगा भक्त प्रल्हाद हा विष्णुभक्त  होता. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी  ईश्वर आहे, अशी त्याची श्रद्धा होती. पण हिरण्यकश्यपूला ते मान्य नव्हते. त्याच्यातला अहंकार, राक्षसी प्रवृत्ती इतकी वाढली होती की, त्याने स्वतःच्याच मुलाचा छळ केला. त्यासाठी भगवंताला नृसिंह अवतार घेऊन त्याचा नाश करावा लागला. जेव्हा जेव्हा अधर्म वाढतो, तेव्हा तेव्हा धर्माच्या स्थापनेसाठी आणि सज्जनांच्या रक्षणासाठी प्रत्येक युगात ईश्वर अवतार घेतो असे श्रीकृष्ण वचन आहे. आज सर्वत्र अनाचार, अत्याचार, अधर्म वाढलेला दिसतो आहे, दुष्ट प्रवृत्तींची आक्रमणे वाढलेली आहेत. पहलगाम हे त्याचे उदाहरण आहे. यासाठी, हे ईश्वरा खरंच अवतार घे ! आणि तुझ्या वाचनाप्रमाणे धर्माची संस्थापना आणि सज्जनांचे रक्षण कर आणि या भारतात शांती नांदू दे!

**रमा देशमुख**/नागपूर

### सहकार क्षेत्राचे सक्षमीकरण होणे आवश्यक

अलिकडेच केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय निर्माण केले आहे. परंतु नुसते सहकार मंत्रालय निर्माण करून आणि परिषदा, परिसंवाद आयोजित करून सहकार क्षेत्राचे प्रश्न सुटणार नाहीत. देशातील प्रत्येक गावामध्ये सहकारी संस्थांच्या वाढीसाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. पण आज परिस्थिती उलट असलेली पाहायला मिळते. सहकारी बँका बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. पतपेढ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण राहिलेले नाही. अगदी छोट्या कारागिराला किंवा शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध करून देण्याची अत्यंत गरज आहे. राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा अधिक लवचीकपणे काम करणाऱ्या सहकारी संस्था या निश्चितच मदतीचा हात देत असतात. अगदी गरीब गरजू छोट्यात छोटा व्यवसाय करणाऱ्याला तातडीने अर्थसाहाय्य मिळवून देण्याचे काम सहकारी संस्था करीत असतात. परंतु जे सहकारी संस्थांना रिझर्व्ह बँकेच्या मदतीने अधिक आर्थिक साहाय्य उपलब्ध झाले तर कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देता येऊ शकते. मागील पाच वर्षांत केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांसाठी जवळपास पाच लाख कोटींची आर्थिक मदत केली. तोट्यात चाललेल्या राष्ट्रीयीकृत बँकांना फायद्यात आणण्याचा प्रयत्न केला गेला आणि त्यातूनच राष्ट्रीयीकृत बँका हळूहळू नफ्यात येऊ लागल्या आहेत. त्यांच्या बुडीत कर्जाचे प्रमाण हळूहळू कमी होत चालले आहे. तर दुसरीकडे सरकारने मुद्रा लोनसारखा प्रकार सुरु केला गेला. परंतु तो प्रामुख्याने व्यापाऱ्यांसाठी उपयोगात आणला जातो. खरेतर सहकारी बँकांसाठी किंवा एकूणच सहकार विश्वासाठी मोठ्या आर्थिक साहाय्याची आवश्यकता आहे. सबका साथ सबका विकास म्हणत असताना जर सहकार विश्वामध्ये विश्वास निर्माण करणे तितकेच गरजेचे आहे. आज दहा ते पंधरा लाख कोटी जर मुद्रा लोनमधून उपलब्ध करून दिले जात असतील तर  सहकारी बँकांना जर काही योजनांची चौकट घालून दिली आणि आर्थिक साहाय्य देण्याची जबाबदरी केंद्र सरकारने पार पडली, तर त्याचा गावपातळीतील प्रत्येकाला त्याचा उपयोग होऊ शकतो.

भविष्यात येणारे कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग लक्षात घेता आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आणि कृत्रिम बुद्धिमत्ता याचा योग्य मेळ घालता येऊ शकतो. किंबहुना या तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक वेगाने सहकाराचे जाळे विस्तारता आले पाहिजे. आज जणूकाही हे आधुनिक तंत्रज्ञान आणि सहकार क्षेत्राचा फारसा संबंध नसल्याचे चित्र निर्माण केले जाते. ते अत्यंत चुकीचे ठरते. भारताची एकूण समाजव्यवस्था लक्षात घेतली आणि ग्रामीण भागाच्या सामान्य माणसाच्या गरजा नीट लक्षात घेतल्या तर आंतरराष्ट्रीय वर्षाप्रमाणे भारतातही राष्ट्रीय सहकार प्रसार वर्ष राबवले गेले पाहिजे. तरच केंद्रात निर्माण केलेल्या स्वतंत्र सहकार खात्याचा योग्य तो उपयोग झाला असे म्हणता येऊ शकेल.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### पाकिस्तानला कायमची अद्दल घडवल्याशिवाय पर्याय नाही

युद्ध कोणतेही असो, धर्मयुद्ध, सामाजिक युद्ध, राजनीतिक युद्ध, राष्ट्रीय युद्ध, आंतरराष्ट्रीय युद्ध, आंतरिक युद्ध, कौटुंबिक युद्ध, मानसिक युद्ध इत्यादी. कलह व असंतोष अधोगतीकडे नेणाऱ्या आणि अस्तित्व नष्ट करणाऱ्या बाबी असतात आणि आहे. भारतीय संस्कृतीमध्ये मानवतावाद, राजनीती व युद्धनीती यावर रामायण व महाभारत ही दोन महाकाव्ये लिहिली गेली आहेत. ही दोन्ही महाकाव्ये आजही सर्वच बाबतीत तंतोतंत लागू पडतात. फक्त वाचायला वेळ मिळायला हवा. महाभारत या ग्रंथात युद्धकांडातील 'श्रीमद्भगवद्गीता' महर्षी व्यास रचित श्रीकृष्णाने पोरखेळ म्हणून अर्जुनाला उपदेश केलेला नाही. यामध्ये एकूणच मानवी जीवनशैली व प्रकांड तत्त्वज्ञान आहे. सर्व भारतीयांनी सर्व धर्मांची ग्रंथसंपदा व इतिहास वाचलाच पाहिजे. अहंकाराने काही माणसे अशी म्हणतात की, मी अमुक अमुक धर्माचा, मी कशाला इतर धर्मीयांचे ग्रंथ वाचू? मला एक म्हणायचे आहे की, बाबा, तू स्वतःच्या धर्माची एवढी दर्पोक्ती मिरवतोस तर, तू ज्या धर्माबद्दल बोलतोस त्याचा तरी इतिहास तुला माहीत आहे काय? मित्रांनो, जेव्हा आपले वाचन नसते तेव्हा इतरांपेक्षा आपण स्वतः फार मोठे आहोत आणि इतर तुच्छ आहेत असा समज करून घेतो. परंतु हा गैरसमज आहे. हे निर्माण करणारे प्रथमतः कुटुंब असते, मित्र, समाज, राजकारणी आणि धर्माचे ठेकेदार इत्यादी असतात. रामायण, महाभारतामध्ये अनुक्रमे प्रभू रामचंद्र व भगवान श्रीकृष्ण यांनी कुठे धर्माच्या (तुम्ही जो समजता तो) नावाचा उल्लेख केला आहे? धर्म म्हणजे काय, तर मानवी जीवन जगण्याची जीवनशैली होय. या जीवनशैलीत दोन भाग येतात. एक चांगला आणि दुसरा वाईट.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तो राहणार. यामध्ये कोणत्याच भारतीयाचे दुमत नाही. आम्ही आमच्या देशाच्या लोकशाहीला, देशाच्या विकासात्मक अस्तित्वाकरिता आणि रक्षणासाठी कटिबद्ध आहोत. 'जिंकू किंवा मरू, माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू'. आम्ही आमच्या मातृभूमीला स्वतःची समिधा अर्पण करण्यास मागेपुढे पाहात नाही. पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ ला निरापराध हिंदू पर्यटकांवर धर्म व मुस्लिम कलमा विचारून गोळीबार केला तो अतिशय निंदनीय आहे. भारत सरकारने यावर जी पावले उचलली आहेत ती टिकून राहणारी असावी आणि ज्या स्तरातून पाकिस्तानची कोंडी करता येत असेल तशी करावी. आर्थिक नाकेबंदी, अंतर्गत कलह, भूकमरी, पाणी बंदी, इतर देशांनी कोणतीच मदत करू नये, याकरिता विदेश कूटनीती आणि वेळ पडल्यास जल, थल व वायुमार्गाचा अवलंब करून लष्करी कारवाई करावी.

**डॉ. अनंतकुमार सूर्यकार**/९४२१७४६८२२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती धाराशिव, सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राज्यस्तरीय खुल्या पुरूष गटाच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.११ मे -**

कळंब येथे दि. १० ,११, व १२ मे रोजी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने राज्यस्तरीय खुल्या पुरुष गटांच्या भव्य कबड्डी स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज तालुका क्रीडा संकुल कळंब येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सदर स्पर्धेचे मान्यवरांच्या हस्ते दिनांक १० मे रोजी सकाळी उद्घाटन करण्यात येणार आहे. सदर स्पर्धा या मॅटवर सायंकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत खेळविल्या जाणार आहेत.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघास ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या संघास ३१ हजार रुपये व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्या संघास २१ हजार रुपये रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

तसेच वैयक्तिक स्वरूपात उत्कृष्ट पकड २५०१, उत्कृष्ट चढाई २५०१,अष्टपैलू ५००१, दिवसाचा सामनावीर २५०१ खेळाडूस बक्षीस म्हणून देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी राज्यभरातून आतापर्यंत २० संघांनी नाव नोंदणी केली आहे.

या स्पर्धेतील विजेत्या संघास १२ मे रोजी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

या स्पर्धेचा जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष, युवक आघाडी शिवजयंती उत्सव समिती कळंब यांनी केले आहे.



# बहिणीची छेड काढल्याचा जाब विचारणाऱ्या १७ वर्षीय मुलाची निर्घृण हत्या, २ आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

लहान वादातून सुरू झालेल्या संघर्षाचे पर्यवसान एका तरुणाच्या हत्येत झाल्याने शहरात संतापाची लाट उसळली आहे. मयत तरुणाच्या शाळकरी बहिणीची छेड काढल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या तरुणांवर निर्घृण हल्ला करण्यात आला. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या मारुती शिवाजी ईटलकर (वय १७) या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, पोलिसांनी या प्रकरणात दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे धाराशिव शहरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी समर्थ दत्ता जाधव (वय २०, रा. पापनाश नगर, धाराशिव) आणि त्याचा मित्र मयत मारुती ईटलकर हे दोघे ८ मे २०२५ रोजी रात्री साडेनऊ वाजता बालाजी नगर येथील प्रियदर्शनी दूध डेअरीच्या पाठीमागील भागात गेले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारुतीच्या शाळकरी बहिणीला काही युवक छेडत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्या प्रकाराचा जाब विचारण्यासाठी हे दोघे गेले होते. मात्र, जाब विचारल्याच्या रागातून आरोपी लहू सुभाष चौधरी, अंकुश चौधरी, किशोर सुभाष चौधरी आणि एका अज्ञात इसमाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला.



या हल्ल्यात लोखंडी रॉड, कोयता, लाकडी वेळू आणि इतर धारधार शस्त्रांचा वापर करत बेदम मारहाण करण्यात आली. आरोपींनी दोघांवर शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या. या मारहाणीत मारुती गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

मारुतीच्या मृत्यूनंतर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला. संतप्त नागरिक आणि कुटुंबीयांनी मारुतीचा मृतदेह थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात नेला. या प्रकारामुळे काही काळ वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले होते. नागरिकांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. जमावाच्या रोषामुळे पोलिस प्रशासनानेही तातडीने हालचाल करत आवश्यक ती कारवाई सुरू केली.

पोलिसांनी गंभीरतेने दखल घेतल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक ओव्हाळ, पोलीस कॉन्स्टेबल रशिदखान पठाण, प्रवीण जमादार आणि सुधीर मोगडे यांच्या पथकाने लहू सुभाष चौधरी आणि प्रवीण सुभाष चौधरी यांना अटक केली. अटक करण्यात आलेल्या दोघांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून, ते चक्री जुगारासारख्या अवैध धंद्यांमध्ये सक्रिय होते. परिसरात त्यांची दहशत असून, वारंवार गुंडगिरी करून नागरिकांना त्रास देत असल्याची माहितीही समोर आली आहे.

याप्रकरणी समर्थ जाधव यांनी १० मे २०२५ रोजी दिलेल्या वैद्यकीय जबाबावरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०९ (१) (गुन्ह्याला उत्तेजन देणे), ११८ (१) (गंभीर दुखापतीच्या उद्देशाने हल्ला), ११५ (२) (गंभीर गुन्ह्याचे प्रोत्साहन), ३५२ (प्रकोपाशिवाय मारहाण), ३५१ (१) (गुन्हेगारी शक्तीचा वापर) आणि ३ (५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. मात्र, आता मारुतीच्या मृत्यूनंतर या प्रकरणात कलम ३०२ (हत्या) लावण्याची शक्यता असून, तपासाची दिशा बदलण्याची चिन्हे आहेत.

या घटनेने धाराशिव शहरात अस्वस्थता आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. एकीकडे तरुण मुलगी छेडल्याच्या प्रकारामुळे चिंता व्यक्त होत आहे,

तर दुसरीकडे अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आरोपींचा सहभाग असल्यामुळे कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. पोलीस अधिकाऱ्यांनी शांतता राखण्याचे आवाहन केले असून, शहरात पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

मयत मारुतीच्या कुटुंबीयांनी आणि स्थानिक नागरिकांनी या प्रकरणात कठोर शिक्षा होण्याची मागणी केली आहे. आरोपींना फास्ट ट्रॅक न्यायालयात जलदगतीने शिक्षा व्हावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून, आणखी काही आरोपींना अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ही घटना केवळ एका कुटुंबावरचा आघात नसून, संपूर्ण समाजाला हादरवणारी आहे. त्यामुळे अशा घटना रोखण्यासाठी प्रशासनाने कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### शव पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या दारात अन् पोलिसांनी खुनी चक्री माफियांना केली अटक

मयत मारुतीच्या कुटुंबीयांनी आणि स्थानिक नागरिकांनी या प्रकरणात कठोर शिक्षा होण्याची मागणी केली आहे. आरोपींना फास्ट ट्रॅक न्यायालयात जलदगतीने शिक्षा व्हावी, अशी मागणी करत सोलापूर येथून मयत मारुतीचे शव थेट पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या दारात आणले. यामुळे तेथे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच नातेवाईकांनी घेतलेला आक्रमक पावित्रा यामुळे पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत दोन आरोपींना अटक केली. हे अटक केलेले आरोपी हे शहरात ऑनलाईन चक्री चालवतात. हे चक्री माफिया बालाजीनगर भागातील नागरिकांना वारंवार त्रास देत असल्याची तक्रारही यापूर्वी शहर पोलिसांकडे करण्यात आली होती. मात्र, त्यावर काहीच कारवाई करण्यात आली नव्हती. ही हत्या होण्यामागे पोलिसांनी न केलेली कारवाईही असल्याचेही बोलले जात आहे.

## तुळजाभवानी मंदिरात कडक सुरक्षाव्यवस्था



### भाविकांची कसून तपासणी... पर्स, बॅग व तत्सम वस्तू घेऊन जाण्यास बंदी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिरात भाविकांची वाढती गर्दी पाहता आणि अलीकडील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कडक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. देशभरातून हजारो भाविक दररोज श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी येथे येत असतात, त्यांच्या सुरक्षेसाठी मंदिर प्रशासनाने अधिक दक्षता घेतली आहे.

मंदिर परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आता पर्स, बॅग व तत्सम वस्तू घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली आहे. भाविकांनी कोणतेही सामान मंदिर परिसरात आणू नये, असे स्पष्ट आवाहन मंदिर प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मंदिरात प्रवेश करताना प्रत्येक भाविकाची मेटल डिटेक्टर व डोअर फ्रेम मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने कसून तपासणी करण्यात येत आहे. भाविकांनी संयम बाळगून सुरक्षाव्यवस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## पारधी समाजातील जेष्ठ समाजिक कार्यकर्ते पंडित भोसले यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

पारधी आदिवासी बहुउद्देशिय सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेचे संस्थापक, केरूर येथील पारधी समाजातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते पंडित बिटु भोसले याना क्रांतीवीर चाफेकर समिती पिंपरी चिंचवड पुणेच्या वतीने दिला जाणारा जेष्ठ समाजसेवक पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या हस्ते मिळाल्याबद्दल पंडित भोसले यांचा सत्कार समन्वय समिती नळदुर्ग सर्कल व पारधी आदिवासी बहुद्देशिय सामाजिक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यामाने आपल घर आलियाबाद नळदुर्ग येथे दि.१० मे रोजी त्यांचा नळदुर्ग पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद कांगुने यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणुन परीवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे, रिपाइं (आठवले)चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, आपल घरचे व्यवस्थापक विलास वकिल, सहशिक्षक तथा पत्रकार भैरवनाथ कानडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद कांगुने आदी होते.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीवीर बिरशा मुंडा यांच्या प्रतिमांचे पुजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यानंतर सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद कांगुने यांच्य हस्ते पंडित भोसले यांचा फेटा, शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ मानपत्र देवून येथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भैरवनाथ कानडे यानी केले तर सुत्रसंचलन एस.के. गायकवाड यांनी केले. मानपत्राचे वाचन दयानंद काळूंके यांनी केले तर अभार प्रदर्शन अरुण लोखंडे यानी केले.

## मुस्लिम समाजाने स्त्री शिक्षणावर भर द्यावे : हसन गौहर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

'मुस्लिम समाजाने मुलींना शिक्षण देण्यास प्राधान्य द्यायला हवे', असे मत पोलीस अधीक्षक गौहर हसन यांनी रविवारी कळंब येथील तालीम फाउंडेशनच्यावतीने आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले आहे. 'तालीम से तरक्की' या कार्यशाळेचे आयोजन तालीम फाउंडेशनच्यावतीने करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन केले. तालीमसे तरक्की म्हणजेच शिक्षणातून यश कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

## तणाव पार्श्वभूमीवर सर्वांनी सतर्क रहावे : जिल्हाधिकारी पुजार यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

भारत पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व यंत्रणांसह नागरिकांनी सतर्क रहावे.असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कक्षातून आज जिल्हास्तरीय यंत्रणांचे प्रमुख तसेच तालुकास्तरीय यंत्रणांच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन बैठकीत पुजार बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेलोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरीदास यांचेसह सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी व अन्य अधिकारी उपस्थित होते.



पुजार म्हणाले की, या तणावाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीचा सराव अर्थात मॉक ड्रिल घ्यावे. यामध्ये संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना सामावून घ्यावे. आपत्कालीन उपचार केंद्र (ट्रामा सेंटर) व सर्व रुग्णालये सज्ज असली पाहिजे. या काळात खोट्या बातम्या अर्थात फेक न्युज प्रसारित होतात, त्या प्रसारित होणार नाही याची खबरदारी घ्यावी. माध्यमांनी अधिकृत बातम्यांना प्रसिद्धी द्यावी. गर्दीच्या ठिकाणी विशेषता मंदिरात कोणीही साहित्य घेऊन जाणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी याबाबत सतर्कता बाळगावी.आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा अद्ययावत करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी पुजार यांनी यावेळी दिले.

जाधव म्हणाल्या की, आपत्ती व्यवस्थापन गावकृती आराखडे तयार करण्याचे निर्देश राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिले आहे.या दृष्टीने तातडीने कार्यवाही करावी.सर्व तहसीलदारांनी हे आराखडे अद्ययावत करावे.आपत्ती व्यवस्थापनाचे नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावे.मुख्यमंत्री कार्यालयाकडून आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित येणारी माहिती नागरिकांना वेळोवेळी द्यावी. नागरिकांनी अफवांना बळी पडू नये. असे त्या यावेळी म्हणाल्या. यादव म्हणाले, जिल्ह्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीचा सराव घ्यावा. सर्व तहसीलदारांनी नागरिकांना सतर्क करण्यासाठी सायरनची खरेदी करावी. या काळात अफवा पसरविल्या जाणार नाही याची दक्षता घ्यावी. जर काही अफवा पसरल्या गेल्या तर तात्काळ त्याचा खुलासा माध्यमांना द्यावा.औषधी व अन्नधान्याचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा असे त्यांनी सांगितले.

हरिदास यांनी सांगितले की, युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व वैद्यकीय आरोग्य केंद्र सज्ज ठेवण्यात आली आहे. आवश्यक तो औषधांचा साठा प्रत्येक आरोग्य केंद्रात पुरेशा प्रमाणात ठेवण्याचे आदेश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झरेगांवकर महाराज यांना स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

आयोध्या येथील श्रीराम जन्मभुमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष राष्ट्रयोगी तपस्वी संत प.पू.आचार्य स्वामी श्रीगोविन्ददेव गिरीजी महाराज यांनी स्थापन केलेल्या गीता परिवार या जागतिक संघटनेकडून सामाजिक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तिंना स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्काराने गौरविले जाते.

ह.भ.प.श्री.निलेश महाराज झरेगांवकर यांनी महाराष्ट्रातील ४७ हजार कैद्यांचे पालकत्व स्विकारून त्यांना समाजांच्या मुख्य प्रवाहात घेऊन येण्याकरिता केलेले सुधारणा व पुनर्वसनाचे कार्य उल्लेखनीय असुन महाराजांचे हे राष्ट्रकार्य निरंतर सुरू आहे. महाराजांच्या



राष्ट्रकार्याची दखल घेऊन नुकताच स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार जाहिर झाला होता. १ लक्ष रुपये रोख सन्मानचिन्ह व गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून आज रोजी दुपारी २:०० वाजता इसरूळ (बुलढाणा) येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते निलेश महाराज झरेगांवकर यांचा स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

प्रसंगी राष्ट्रसंत आचार्य स्वामी श्रीगोविंन्ददेव गिरीजी महाराज गीता परिवारचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय मालपाणी, धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले, बुलढाणाचे आ.संजय गायकवाड, चिखलीच्या आ.श्वेताताई महाले यांच्यासह वारकरी संप्रदायातील अनेक मंडळी या सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत. तत्कालीन पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांनी स्थापन केलेल्या all India Conference of Intellectuals या दिल्ली येथिल संस्थेचा ४६ वा राष्ट्रीय पुरस्कार देखिल डिसेंबर २०२४ मदे झरेगांवकर महाराजांना यांना मिळाला आहे. तसेच हा दुसरा स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुरस्कार त्यांना मिळत असल्याने सर्व स्तरातुन त्यांचे कौतुक होत आहे.

## अमृता उंदरे व डॉ.अशोक कदम यांचा निवडीबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ मे -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे प्रभार देवघेवीचा व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड झालेल्या गटविकास अधिकारी कुमारी अमृता महादेव उंदरे यांचा सत्कार समारंभ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या आदेशाने दि.१० मेपासून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.अशोक कदम यांची नेमणूक केल्यामुळे प्रभारी प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे यांनी संस्थेचे खजिनदार जयकुमार बापू शितोळे यांच्या उपस्थितीमध्ये प्रा.डॉ.अशोक कदम यांच्याकडे पदभार सोपवला.

यावेळी संस्थेचे खजिनदार माननीय जयकुमार बापू शितोळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मच्छिंद्र कवडे, श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीचे प्राचार्य डॉ.ए.बी. शेख, प्रा..डॉ.समाधान पवार



आणि सत्कारमूर्ती कुमारी अमृता उंद्रे व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. यावेळी बोलताना शितोळे म्हणाले की, महाविद्यालय स्थापनेपासून प्रत्येक प्राचार्यांनी आपापल्या परीने महाविद्यालय पुढे नेण्यासाठी प्रयत्न केले. तद्वतच नवनियुक्त प्राचार्य डॉ.अशोक कदम आणि अमृता उंद्रे यांनी आपल्यासाठी नाही तर इतरांसाठी चांगले काम करावे असे ते म्हणाले.

यावेळी बोलताना महाविद्यालय विकास समितीचे सदस्यय मच्छिंद्र कवडे म्हणाले की, मामांच्या नावे असलेले हे महाविद्यालय ग्रामीण भागामध्ये चांगले काम करत असून आणखीन त्यामध्ये सातत्याने गुणवत्तेच्या रूपाने वाढ होणे व गटविकास अधिकारी कुमारी अमृता उंदरे यांच्याप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थी घडणे अपेक्षित आहे. माजी प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे बोलताना म्हणाले की गेल्या १६ महिने नऊ दिवसांमध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू मानून माझ्या परीने चांगले काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यापुढेही नूतन प्राचार्यांना वेळोवेळी गरजेनुसार सहकार्य करत राहणार नूतन प्रभारी प्राचार्य डॉ.अशोक कदम म्हणाले की, यापूर्वी मी या महाविद्यालयामध्ये नऊ वर्षे सेवा केल्यामुळे येथील कामाचा मला चांगला अनुभव असून संस्थेनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे त्याची जाणीव ठेवून हे महाविद्यालय सर्वांना सोबत घेऊन विशिष्ट उंचीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न करणार आहे. श्री शिवाजी महाविद्यालय बार्शीचे प्राचार्य डॉ.शेख म्हणाले की आमच्या सेवेची सुरुवात याच महाविद्यालयातून झाल्यामुळे हे एक चांगले महाविद्यालय असून या महाविद्यालयामध्ये काम करण्यास भरपूर वाव आहे, असे ते म्हणाले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एस . पि . साहेब जालन्यात खुलेआम गुटखा , मटका , लॉट्री , चक्री अवैधरित्या धंदे चालु त्यांना आवर घाला - शमशोद्दीन शेख

## सचिन तारगे वर कारवाई केली तशी सतीश लालावरही करावी ?



श्री बंसल साहेब
पोलिस अधिक्षक जालना

**तभा वृत्तसेवा**
**जालना / सुरेश कवडे**

जालना शहरातील बस स्थानक , रेल्वे स्थानक , शिवाजी महाराज पुतळा , पाणीवेस , भोकरदन नाका , लक्कडकोट टि पॉईट अश्या मोक्याच्या ठिकाणी मटक्यांच्या एजंटानी आपले बस्तान घातले असताना जालना शहर पोलिसांना जणु या अवैध धंदयाची माहिती नाही ? मग आपली गोपनीय शाखा करते तरी काय ? या अवैधरित्या धंदयावाल्यांचे जालना शहर जणु माहेरघर म्हणून ओळखले जात आहे . असा सवाल समाजात असेलेल्या प्रतिष्टीत नागरिकांना पडतो . शहरात अनेक पानटपऱ्यांवर खुलेआम अवैधरित्या गुटखा विक्री होते . यावरही आपले पोलिस बांधव कोणत्याही प्रकारची कारवाई का करत नाहीत . अशे एक नाहीतर अनेक अवैधरित्या चालणारे धंदे जालना शहरात खुलेआम आपले बस्तान मांडुण बसले आहेत . अश्यातच शहरातील काही मुख्य रस्त्यावर लाल रंगाचे कपडे झाकून चक्री बोगस ऑनलाईन लॉट्री या अवैधरित्या धं द्यावाल्यानी पार जालना शहरात धुमाकुळ घातला आहे . हे अवैध धंदे चालवणारे गुंडप्रवतीचे लोक आसुन त्यांच्यावर अनेक गंभीर गुन्हेही दाखल आहेत . ह्या लोकांनी गोरगरीब लोकांना पैस्याचा मोह दाखवून अनेकांना आपल्या जाळ्यात अडकवले आहे . त्यामुळे शहरातील अनेक व्यापाऱ्यांच्या मुलांनी आत्महत्याही केल्याच्या घटना घडल्या आहेत तर अनेकजन कर्जबाजारी झाले असुन अनेकांनी जालना शहर सोडून इतरत्र कोठेही निघुन गेल्याच्या घटना आहेत . तरी मटका , घुटखा , चक्री , अवैध लॉटरी यांसाखे जालना शहरातील धंदे पोलिस अधीक्षक म्हणून आपण पुढाकाराने तात्काळ बंद करावे तसेच अवैधरित्या धंदे चालवणारे लोकांवर तात्काळ गंभिर स्वरूपाचे गुन्हे दाखल करुण कारवाई करावी .नसता जालना जिल्हा असंघटीत कामगार व कर्मचारी कॉग्रेस पक्षाच्या वतीने आपल्या कार्यालसमोर उपोषण करण्यात येईल . याची नोंद घ्यावी तसेच या निवेदनावर पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख शमशोद्दीन शेख नुर सह सुभाष कचरू कांबळे , सय्यद अनिस सय्यद शनशोद्रीन आंदीच्या स्वाक्षऱ्या आहेत .





## संक्षिप्त

### वक्फ सुधार जनजागरण अभियान अंतर्गत भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाची कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

वक्फ सुधार जनजागरण अभियान अंतर्गत भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाची कार्यशाळा ता.०७ रोजी भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाली. यावेळी भाजपा अल्पसंख्यक मोर्चा चे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर यांची प्रमुख उपस्थिती होती,



यावेळी त्यांनी अल्पसंख्यांक मोर्चाच्या कार्येकर्ताला भेटुन वक्फ बोर्ड संशोधन बिल चे फायदा आणि समर्थन का महत्वाचे आहे या विषयावर माहिती दिली व अल्पसंख्यक मोर्चाच्या कार्यकर्त्यांना जनतेला भेटुन वकफ बोर्ड संशोधन बिल किती महत्वाचे आहे हे स्पष्ट करण्याच्या सूचना दिल्या. या कार्ये कर्मात भाजपा अल्पसंख्यक प्रदेश सचिव सिकंदर आलीसाहब, भाजपा अल्पसंख्यक महानगर अध्यक्ष सैयद इमरान अली, तसेच पदाधिकारी नूर लाला खान, सज्जाद काजी, जुनेद मिर्जा, नदीम कुरैशी, शमाबाजी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती .

### गोद्री येथे घाणीचे साम्राज्य गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात
### ग्रामपंचायतचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील गोद्री येथे घाणीचे साम्राज्य पसरल्याने गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.नाली अभावी प्रत्येकांच्या घरासमोर ठिकठिकाणी पाणी साचल्याने



काही ठिकाणी तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.तसेच स्वच्छता केवळ नावाला राहिली असल्याचे चित्र दिसून येत आहे.गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्याने साथीचे रोग पसरत आहे. अनेक नागरीकांना साथीच्या आजारांना तोंड द्यावे लागत आहे.भविष्यात नागरीकांना गंभीर आजार होण्याची भितीही व्यक्त होत आहे.याकडे ग्रामपंचायत जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतांना दिसत आहे.प्रत्येक गल्लीत जागोजागी कचरा व पाण्याचे डबके साचले असून,नाल्या तूंबलेल्या आहेत . नागरीकांना रस्त्यावर चालणे कठीण झाले असून दुर्गंधीही सुटल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे.घाणीमुळे नागरीकांना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.ग्रामपंचायतीच्या दर्लक्षामुळे साथीच्या आजारांना निमंत्रण मिळत असल्याने याचे दुष्परिणाम मात्र गावातील जनतेला भोगावे लागत आहे.वरिष्ठांनी याकडे तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी ग्रामस्थांनाकडून होत आहे.

## अंबड तहसीलमध्ये रस्ते प्रकरणात सस्ती अदाल लतीत सात प्रकरनांचा निवाडा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/ प्रतिनिधी**

माननीय विभागीय आयुक्त श्री दिलीप गावडे सर यांच्या संकल्पनेतून व आदेशान्वये अंबड तालुक्यात रस्त्याच्या प्रकरणाच्या बाबतीत सस्ती अदालत घेण्यात आली...सदर वेळी वेगवेगळ्या गावातील १९ प्रकरण सस्ती अदालतीमध्ये घेण्यात आलेली होती त्यापैकी ७ प्रकरणात सामंजस्याने तोडगा निघाला, असून रस्त्याच मार्ग मोकळा झालेली आहे.....उर्वरित प्रकरणे हे काही तांत्रिक कारणामुळे क्लियर झालेली नसून येत्या २३ तारखेच्या दिवशी ठेवण्यात आलेली आहे..काही प्रकरणांमध्ये किरकोळ स्थळ पाहणी करण्याची विनंती दोन्ही बाजूंनी केल्यामुळे तशी विनंती मान्य करण्यात आलेली आहे..येत्या २३ तारखेला इतर प्रकरण हे सस्ती अदालतीमध्ये निकाली निघतील..सदरील मोहीम माननीय विभागीय आयुक्त माननीय दिलीप गावडे सर त्याचबरोबर माननीय जिल्हाधिकारी डॉक्टर श्रीकृष्ण पांचाळ अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रीता मेत्रेवाड मॅडम त्याचबरोबर माननीय निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांच्या मार्गदर्शनाअन्वये ही मोहीम राबविण्यात आलेली आहे... या मोहिमेत अनेक शेतकऱ्यांचे जे किरकोळ शेती रस्त्याचे प्रश्न होते ते निकाली निघालेले आहेत..त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी याबाबत समाधान व्यक्त केलेले आहे..विशेष बाब म्हणजे मंडळ अधिकारी वडीगोद्री संदीप नरोटे यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन सस्ती अदालत च्या माध्यमातून दोन्ही पक्षकार शेतकऱ्यांच्या सहमतीने व सामंजस्याने रस्त्याचे प्रकरण निकाली काढले ही बाब विशेष आहे.....गट क्रमांक १९४ मौजे टाका येथील श्री अंबादास गायकवाड यांचा दोन वर्षांपूर्वीपासूनचा रस्त्याचा वाद अर्जदार वगैरे अर्जदार यांच्यामध्ये समझोता करून जाग्यावर मिटवला....सस्ती आदालत यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा वाचतो आणि आपापसातील संबंध हे सुमधुर राहतात... त्यामुळे गावातील वातावरण सुद्धा प्रेमाचे राहतात.... म्हणून सदर मोहिमेचा फायदा सर्व लोकांना होत असल्यामुळे सर्व लोकांनी आपापली रस्त्याचे प्रकरणे सस्ती अदालत या मोहिमेच्या माध्यमातून निकाली काढून घ्यावेत असे आवाहन करण्यात येत आहे... अंबड तालुक्यातील मोहीम यशस्वी करण्यासाठी माननीय विजय चव्हाण तहसीलदार अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार महसूल महेंद्र गिरगे, गजानन महानोर, भागवत देशमुख इत्यादींनी मेहनत घेतलेली आहे .

## पहलगाम हल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याच्या कर्तुत्वाला सलाम - मुट्ठे

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद / प्रतिनिधी**

आज भारतीय सैन्याने दहशतवाद्यांना ठोस उत्तर देत, आपल्या सुरक्षा दलांच्या धाडसाचं आणि क्षमतेचं प्रात्यक्षिक पुन्हा एकदा जगाला दाखवून दिलं आहे. कोणताही राजकीय मतभेद न ठेवता, एक भारतीय म्हणून आपल्या शूर जवानांना आणि निर्णयक्षम सैन्याला सलाम च करावा लागेल अशी प्रतिक्रिया भारतीय माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुंडलिक पा मुट्ठे यांनी दिल्या आहे.

हा केवळ प्रतिशोध नव्हे, तर शांततेसाठीचा निर्धार आहे. हे केवळ आक्रमण नव्हे, तर निर्दोष नागरिकांच्या सुरक्षेसाठीचा प्रामाणिक प्रयत्न आहे.जय हिंद म्हणणं सोपं आहे, पण अशा क्षणी आपल्या अंतःकरणातून ''जय जवान'' निघणं, हेच खऱ्या अर्थाने देशभक्तीच दर्शन आहे. त्यामुळे आपल्या भारतीय लष्कराच्या कर्तुत्वाला सलाम करत, वेळप्रसंगी आम्ही भारतीय माजी सैनिक देखील आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी तयार असल्याच्या प्रतिक्रिया भारतीय माजी सैनिक संघटना जिल्हाध्यक्ष कुंडलिक पा.मुट्ठे यांनी याप्रसंगी दिल्या आहे.

## चौंडीच्या इतिहासाची माहिती देण्यासाठी संशोधक रामभाऊ लांडे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जन्मभूमी चौंडी ता.जामखे जिल्हा अहिल्यानगर येथे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, सभापती प्रा.शिंदे सर,युवराज यशवंतराव होळकर, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत दि.६ रोजी मंत्रीमंडळाची कॅंबीनेट बैठक संपन्न झाली.या बैठकीसाठी उपस्थित राहणारे मंत्रीमहोदय, मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी, पोलीस, महसूल, पाणीपुरवठा, जिल्हा परिषद विभाग तसेच आमदार आदी लोकांना चौंडी गावचे ऐतिहासिक महत्त्व तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी राज्याच्या गौरवशाली इतिहासाची माहिती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून इतिहास संशोधक श्री. रामभाऊ लांडे यांची नियुक्ती केली होती.यावेळी होळकर राजघराण्यांचे युवराज श्रीमंत यशवंतराव होळकर व मंत्रीमहोदय श्री. जयकुमार रावळ यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे जन्मठिकाण,थोरले श्रीमंत पेशवे बाजीराव व सुभेदार मल्हारराव होळकर यांची बाल अहिल्येशी सीना नदीत झालेल्या भेटीचे ठिकाण, चौंडीचे पाटील माणकोजी पाटील बाबा शिंदे यांचा प्रशस्त वाडा,वाड्यातील विविध दालन,वाड्याचा इतिहास,अहिलेश्वर, सिनेश्वर महादेव मंदिर,नक्षत्रवन ,किर्तीस्तंभ,सुशीलादेवी, माणकोजी पाटील, बंधू महादजी व शहाजी यांच्या समाध्यांचा इतिहास, चौंडीकर शिंदे घराण्याची वंशावळ बद्दलची सविस्तर माहिती देण्यात आल्याचे श्री. लांडे यांनी म्हटले. दि.६ रोजी चौंडी येथे झालेल्या कॅंबीनेट बैठकीसाठी तीन ते चार हजार लोक उपस्थित होते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिल्पसृष्टीतील वारसा स्थळांची तपशीलवार माहिती देण्यासाठी रामभाऊ लांडे यांनी पुढाकार घेतला होता.होळकर राजघराण्यांचे सोळावे वंशज श्रीमंत यशवंतराव होळकर आणि मंत्री श्री. जयकुमार रावळ यांचेसमवेत,श्री. ऋषीकेश पागणीस,होळकरवाडा व्यवस्थापक श्री. आदीत्य फत्तेपुरकर,अहिल्यादेवींच्या आजोळातील श्री. खंडेराव अप्पा मैंदाड, सुभाष मैंदाड, श्री. झेलम शिपंले,श्री. बाबासाहेब वैराळ आदी उपस्थित होते.

## मंठ्यात पुन्हा बंद घरातचे कुलूप तोडून घरात घुसून पन्नास हजार रोखरक्कम व दागिनेची चोरी



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरात दिवसा चोऱ्या होण्याचे प्रकाराचे सत्र सुरूच आहे.शहरात वार्ड क्रमांक दोन ईदगाह नगर येथे मस्जीदीचे इमामाचे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा तब्बल ७५००० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. घरात ठेवलेले सुमारे पाच ग्रामाचे सोन्याचे दागिने चोरट्याने लंपास केले आहे. याप्रकरणी सय्यद मुतीउल्लाह सनाउल्लाह यांनी १० मे २०२५ रोजी मंठा पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंदविली आहे. मोठ्या बहिणीच्या अंत्यविधीसाठी गावी गेले असल्याने त्यांचे घर ०९ मे २०२५ शुक्रवारी दिवसभर बंद होते. याचदरम्यान घराच्या समोरील दरवाजाचे लोखंडी ग्रील व लाकडी दरवाजा उघडून चोरटे घरात घुसले. घरातील बेडरुममध्ये घुसून चोरट्यांनी लोखंडाचीपेटीमध्ये उचकापाचक करून ५० हजार रुपयांची रोख रक्कम, पाच ग्राम सोन्याचे दागिने, २५००० किंमतीचे दागिने चोरून नेले. सय्यद हे शुक्रवारी रात्री घरी आल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी स्थानिक नगरसेवक यांच्या हस्ते मंठा पोलिस स्टेशनला फोन करून चोरीची माहिती दिली. त्यानंतर मंठा पोलिसांनी चोरी झालेल्या घराची पाहणी केली. पोलीस पथकाकडून ही पाहणी करण्यात आली परंतु काही मिळून आले नसल्याची माहिती मंठा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक निकाळजे यांना दिली. सय्यद यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास मंठा पोलीस करीत आहे .

# महाराणा प्रतापसिंह जयंती महोत्सवात राष्ट्रभक्तीचा जागर आणि शौर्याची गाथा

## शिवकालीन शस्त्रप्रदर्शन, मल्लखांब आणि राष्ट्रभक्तीचा अविस्मरणीय संगम



**एक ना एक दिवस पाकवरही भगवा फडकेल–आ. खोतकर**

**कार्यक्रमस्थळी शिवकालीन शस्त्रास्त्रांची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करताना युवक–युवतींनी जणू महाराणा प्रतापसिंह आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत दर्शन घडवले. याच अनुषंगाने कार्यक्रमस्थळी बोलताना आ. अर्जुनराव खोतकर यांनी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांच्या शौर्याचा इतिहास आपल्या तरुणांच्या नसानसात वाहतोय. आमचे युवक केवळ मंचावरच नव्हे, तर सीमारेषेवरही देशासाठी लढण्यास सज्ज आहेत. थोडे दिवस वाट पहा... एक ना एक दिवस असा येईल, जेव्हा पाकिस्तानच्या भूमीवरही भगवा सन्मानाने फडकेल!, असा विश्वास खोतकर यांनी व्यक्त केला. त्यावर उपस्थितांनी टाळ्याच्या कडकडाटात 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या जयघोष केल्याने परिसर दणाणून गेला.**

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती, सकल क्षत्रिय राजपूत समाज, महाराणा प्रतापसिंह फाउंडेशन, प्रतिष्ठान मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ९ मे रोजी हिंदूसूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांचा जयंती सोहळा दुग्धाभिषेक, ध्वजारोहण, शिवकालीन शास्त्रांची प्रदर्शनी, महिलांसाठी कराटे प्रशिक्षण, रक्तदान शिबिर, आतषबाजी आदी विविध उपक्रमांनी साजरा साजरा झाला. हा सोहळा क्षात्रतेज, इतिहासभान आणि राष्ट्रप्रेम जागवणारा ठरला. शिवकालीन विविध शस्त्रांचा अनुभव व मल्लखांबाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकामुळे जनता हरखून गेली.

शुक्रवारी सकाळी मस्तगड येथील मंमादेवी चौकात महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पोलीस बॅंडपथकाने सादर केलेल्या मानवंदनेने वातावरण भारावून गेले. त्यानंतर ध्वजारोहण झाले. यानंतर आयोजित भव्य रक्तदान शिबिरात ५२ जणांनी रक्तदान करून समाजसेवेची जाणीव व्यक्त केली. सायंकाळी ५ वाजता पार पडलेल्या मल्लखांबाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. आयोजित करण्यात आलेल्या शिवकालीन शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनाने इतिहासाचा जिवंत अनुभव दिला. तलवारी, भाले, गज, दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांचे दर्शन म्हणजे प्रत्यक्ष शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचे स्मरण आणि काळाच्या पडद्यामागे डोकावून पाहण्याची संधीच ठरली. महिलांसाठी स्वसंरक्षणाचे कराटे प्रशिक्षण उत्साहात पार पडले. ७ वाजता खुशालसिंह ठाकुर व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री मंमादेवीची आरती करण्यात आली. यावेळी सोलापूरच्या प्रसिद्ध डीजेच्या वादनाने संपूर्ण परिसर मंगलमय झाला.

रात्री ८ वाजता पार पडलेल्या जयंती उत्सव मुख्य कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ. कल्याण काळे, आ. अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, अक्षय गोरंट्याल, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव आंबेकर, पंडितराव भुतेकर, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, संतोषराव मोहिते, जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत साहनी, शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, गणेशराव राऊत, विजय चौधरी, विनोद यादव, दिनेश भगत, सुरेश राऊत, गणेश सुपारकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. जयंती समितीचे अध्यक्ष खुशालसिंह ठाकुर आणि पदाधिकाऱ्यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना आ. खोतकर म्हणाले की, महाराणा प्रताप यांच्या शौर्याचे सर्वोच्च उदाहरण म्हणजे हल्दीघाटीचे युद्ध. महाराणा प्रताप यांच्याकडे फारच थोडी सेना होती, तरीसुद्धा त्यांनी मुघल सेनेला जोरदार प्रतिकार केला. हल्दीघाटीनंतर महाराणा प्रतापने हार मानली नाही. त्यांनी जंगलात राहून, अन्नपाण्यावाचूनही संघर्ष चालू ठेवला. स्वतः आणि कुटुंबीयांसोबत कठीण परिस्थितीत जगत राहिले, परंतु मेवाडच्या स्वातंत्र्यावर कधीही तडजोड केली नाही, ते म्हणाले.



आ. कैलास गोरंट्याल यांनी ''एक चुटकी सुंदर की किंमत तुम क्या जानो बाबू'', या शेर शायरीने भाषणाची सुरुवात करून, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याची पाकिस्तान कशी किंमत मोजत आहे, हे सांगून पाकिस्तान विरुद्ध केंद्र सरकारने उचललेल्या पावलाचे कौतुक केले. भास्करराव आंबेकर म्हणाले की, शेकडो वर्षानंतरही महाराणा प्रतापसिंह यांचे कार्य प्रेरणा देत असून स्वाभिमानासाठी लढणारा योद्धा अशी त्यांची ख्याती आहे. या देशाचे सैन्य शत्रूवर तुटून पडते तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांचे शौर्य अधोरेखित होते, असे ते म्हणाले. प्रास्ताविकपर भाषणात समितीचे अध्यक्ष खुशालसिंह ठाकुर म्हणाले की, मेवाड ही वीरांची भूमी आहे. मातृभूमीचा सन्मान आणि रक्षणासाठी महाराणा प्रतापसिंह यांनी सर्वस्वाचा त्याग केला. त्यांचा आदर्श प्रत्येक तरुणाने डोळ्यासमोर ठेवावा, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचा समारोप भव्य आतषबाजीने झाला. या उत्सवाच्या यशस्वीतेसाठी जयंती उत्सव समितीचे राजेंद्रसिंह ठाकूर, प्रा भगवानसिंह डोभाळ, बजरंगसिंग राजपूत, बाबासिंग बायस, नारायण सूर्यवंशी, सुमेर ठाकूर, लखन ठाकूर, देवेंद्र बुंदेले, नागेश बेनिवाल, शक्ती राजपूत, विकी राजपूत, प्रा. गौरव ठाकूर, किशोर माधववाले, राहुल राजपूत, कुणाल ठाकूर, नीरज ठाकूर, अमोल ठाकूर, पंकज अंधारे, शिवम राजपूत यांच्यासह पदाधिकारी आणि सकल क्षेत्रीय राजपूत समाजाने विशेष परिश्रम घेतले.

## परतुर पोलिसांची मोठी कारवाई विदेशी दारू सह पकडला महेंद्रा पिक अप. ७,८८,८०० रुपये किमतीचा मुद्द्यामाल जप्त.

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**

दिनांक ०९/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक सुरवसे साहेब यांना त्यांच्या गुप्त बातमी दारा मार्फत माहिती मिळाली की साईनगर परतुर येथे चार चाकी बोलेरो पिक अप गाडीमध्ये विदेशी दारूच्या मालाची चोरटी वाहतूक करीत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने पोनि सुरवसे साहेब यांनी तात्काळ स्टाफ ला माहिती देऊन रवाना केले. त्यावेळी साईनगर येथे स्टाफ गेला असता सदर पिकप हे सरकारी दवाखान्याच्या दिशेने जात असताना दिसले त्याचा पाठलाग केला असता त्याला थांबवून पिकप ची झडती घेतली असता पिकप मध्ये विदेशी दारूचे ११ बॉक्स मिळून आले . बॉक्स व पिक अप जप्त करून पोलीस ठाणे परतुर येथे आरोपी नामे १) ओंकार उर्फ वंकर रामराव फटिंग वय २८ वर्ष रा साई नगर परतूर २) सोन्या सिंग प्रेमसिंग टाक वय ४५ वर्ष रा साई नगर परतूर यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे

**सदरची कारवाई**

**मा. श्री अजय कुमार बंसल साहेब, पोलीस अधीक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपनी साहेब , अप्पर पोलिस अधीक्षक साहेब, मा. श्री. दादाहरी चौरे साहेब, डूझज परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी सुरवसे, पोलिस निरीक्षक, पो स्टे. परतूर, पोलीस उपनिरीक्षक केंद्रे साहेब,, पोहेका/ अशोक गाडवे, पोका/अच्युत चव्हाण , पोका/राम हाडे, पोका/ दीपक आडे, पोका/ सतीश जाधव,यांनी केली असून पुढील तपास पोहेका अशोक गाढवे करीत आहेत.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## जुगार अड्ड्यावर छापा; दोन लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**उमरगा, दि.११ मे -**

उमरगा शहरातील बसवेश्वर विद्यालयाच्या मागे लोणी प्लॉट येथे घरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर उमरगा पोलिसांनी छापा टाकला. ११ जणांवर कारवाई करत दोन लाख ८३ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

लोणी प्लॉटमध्ये विठ्ठल चौगुले यांच्या घरात शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास जुगार सुरू होता अशी गुप्त माहिती उमरगा पोलिसांना मिळाली. उमरगा पोलिसांना माहिती मिळताच छापा टाकला. ११ जणांवर कारवाई करत दोन लाख ८३ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ११ जणांवर महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित विठ्ठल वामन चौगुले (रा.गौतम नगर, उमरगा), अरुण गोरोबा बिराजदार (रा.यळवट, ता.औसा, जि.लातूर), गोविंद मारुती सगर (रा. सुंदरवाडी, ता.उमरगा), वामन लक्ष्मण गायकवाड (रा. डिग्गी, ता. उमरगा), महादेव काशिनाथ सलके (रा.महात्मा फुले नगर, उमरगा), संदीप दत्तात्रय गायकवाड (रा.पतंगे रोड, उमरगा), अजित रतन चव्हाण (रा.कदेर, ता. उमरगा), ज्ञानेश्वर माणिकराव पाटील (रा.तुरोरी, ता.उमरगा), इस्माईल युनूस पटेल (रा.लामजाना, ता.औसा, जि. लातूर), मदार शेख (रा.मलंग प्लॉट, उमरगा), संतोष बापू नारंगवाडे यांच्यावर जुगार खेळताना कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, सपोनि पांडुरंग कन्हेरे, पो.ह. चेतन कोंगुलवार, पो. कॉ. योगेश सूर्यवंशी, पो. कॉ. प्रवीण नळेगावकर यांनी केली.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### जाधव गुरुजींच्या जन्मदिनानिमित्त विविध उपक्रम

**इटकळ, दि.११ मे -**



बाभळगाव येथील ह.भ.प. अशोकराव जाधव गुरुजी बाभळगावकर राज्य उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी महासंघ उत्कृष्ट प्रवचनकार उत्कृष्ट कीर्तनकार उत्कृष्ट व्याख्यानकार सामाजिक प्रबोधनकार यांचा ६० वा जन्मदिवस ११ मे रोजी विविध सामाजिक व धार्मिक उपक्रमाने मित्र परिवाराच्या वतीने साजरा करण्यात येणार आहे. हभप अशोकराव जाधव गुरूजी हे निरपेक्ष सेवेच्या माध्यमातून गाव परिसरात पोथी पुराण प्रवचन व कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करतात आणि त्यांचाच ११ मे हा जन्म दिवस मित्र परिवाराच्या वतीने साजरा करण्यात येणार आहे.



### ४२ व्या वाढदिवसानिमित्त ४२ किराणा किट वाटप

**मंगरूळ, दि.११ मे -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील युवा सामाजिक कार्यकर्ते बालाजी डोंगरे यांनी त्यांच्या ४२ व्या वाढदिवसानिमित्त ४२ अनाथ, गोरगरीब, शेतकरी, शेमजूर यांना किराणा किट वाटून आगळ्यावेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. गेल्या तीन चार वर्षापासून हा सामाजिक उपक्रम राबवत असून यामुळे एक नवीन ऊर्जा शरीरात निर्माण होत असून आत्मिक समाधान व आनंद ही प्राप्त होत असल्याचे प्रतिपादन त्यांनी प्रस्तुत व्यक्त केले. यामध्ये गहू, तांदूळ, तेल, मीठ व इतर किराणा साहित्य एकत्रितपने मिळाल्याने गोरगरिबांच्या चेहऱ्यावरही आनंद होता. आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल मंगरूळ व परिसरातून कौतुक केले जात आहे.



### इटकळ येथील सप्ताह सोहळ्याची सांगता

**इटकळ, दि.११ मे -**

मौजे इटकळ येथील श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची मोठ्या उत्साहात सांगता. प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह सोहळा आनंदात पार पडला.३ मे ते ९ मे या सात दिवसाच्या दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. शुक्रवार दि.९ मे रोजी सकाळी दहा वाजता गावात ग्रंथ व माऊलीच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली व दुपारी १२ वाजता काल्याचे कीर्तन आणि हभप.आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांच्या हस्ते काला वाटप करण्यात आला. त्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसाद रामभक्त शंकर वाघमोडे यांच्या वतीने देण्यात आला होता. यावेळी रामभक्त भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उपडाक घराचे खा.ओमराजे यांच्या हस्ते उद्घाटन

**धाराशिव, दि.११ मे -**



कंळब तालुक्यातील इटकुर येथे नवीन उप डाक घर कार्यालयाचे उद्घाटन खा.ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते झाले व धाराशिव कळंबचे आ. कैलास पाटील उपस्थित होते. या ठिकाणी उप डाकघर कार्यालय मंजूर करण्यासाठी अनेक दिवसापासून प्रयत्न करण्यात येत होते ही बाब खा.ओमराजे निंबाळकर यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी या प्रश्नांमध्ये तत्काळ लक्ष घालत मंत्री याच्याकडे पत्रव्यवहार करून ईटकुर येथील कार्यालय मंजूर करणेबाबत विनंती करण्यात आली होती. यानंतर सदर कार्यालय निवडणूक झाल्यानंतर सुरू होईल, असे पत्राद्वारे कळवले होते. तद्नंतर ४१३६२५ या पिन कोड सह नवीन उपडाक घर कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

### गोवंशीय जनावरांची निर्दयी वाहतूक; गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.११ मे -**

नयुम आयुब सौदागर (वय ४६, रा. भुम, धाराशिव) याने ४ जर्शी गायी व २ वासरे असे एकूण ४.४५ लाख रुपयांचे गोवंशीय जनावरे चारा-पाणी न देता निर्दयपणे पिकअप वाहनातून कत्तलीसाठी बेकायदेशीरपणे वाहतूक करताना वाहनासह एकुण ४,४५,००० रुपये किंमतीचे गोवंशीय जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना वाशी पोलीसांना मिळून आले. मिळून आला. ही घटना ९ मे रोजी पार्डी शिवारातील पुलावर उघडकीस आली. पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे.





## जिल्ह्यात यावर्षीच पाणी येणार : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

कृष्णा-मराठवाडा सिंचन योजनेचे काम वेगाने सुरु असून अनेक अडचणींना समोरे जावून मात करुन काम प्रगतीपथावर आहे. यंदाच पश्चिम महाराष्ट्राचे पाणी यंदाच जिल्ह्यात येणार असल्याची माहिती मित्र उपाध्यक्ष आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

ते आज प्रकल्पाची पाहणी करताना आयोजित पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले की, महायुती सरकारच्या काळात सुप्रिमो ऑर्डर मिळाली आहे. त्याचबरोबर निधीची तरतूद करुन निविदाही काढण्यात आल्या. यामुळे काम मोठ्या प्रमाणात सुरु असून येत्या ऑगस्ट २०२५ मध्ये हे पाणी जिल्ह्यात येणार आहे. भोयरे पंपहाऊसच्या स्लॅबचे काम सुरु असून ते मेकॅनिकल विभागाला सोपविण्यात येणार आहे. काम वेगाने करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. यावेळी जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता विजयकुमार थोरात, कार्यकारी अभियंता अमोल नाईक, प्रवीण चावरे आदी उपस्थित होते.

## मारहाणीच्या दोन घटना; गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**

जिल्ह्यातील परंडा व कळंब तालुक्यांमध्ये मारहाणीच्या दोन वेगवेगळ्या घटनांनी खळबळ उडवली आहे.परंडा तालुक्यातील रोसा फाटा येथील सिमाई हॉटेलमध्ये दि. ९ मे २०२५ रोजी दुपारी १.३० च्या सुमारास महादेव संतोष नलवडे यांच्यावर भिमराव, बब्रुवान, वैभव, सचिन, लक्ष्मण जगताप व अन्य तिघांनी जुने भांडण उफाळून आल्याने हल्ला केला. आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी, पाईप, दगड, तलवार व चाकूने मारहाण केली. नलवडे हे जखमी झाले असून, त्यांना जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली. परंडा पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत कळंब तालुक्यातील देवधनोरा येथे दि. ९ मे रोजी सायंकाळी ६.५० वाजता शिवकृपा किराणा दुकानासमोर सागर शहाजी बोंदर यांनी हनुमंत पांडुरंग बोंदर यांना शिवीगाळ करत लोखंडी कड्याने मारहाण केली. या प्रकरणातही पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या दोन्ही घटनांमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

## परंडा येथे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.११ मे -**



परंडा शहरातील महाराणा प्रतापसिंह प्रतिष्ठाणच्या वतीने विर शिरोमणी मेवाडरत्न महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी माजी आ.सुजितसिंह ठाकूर आणि माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दीवाल यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या भव्य मुर्तीचे पुजन तसेच पुष्पहार अर्पन करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी मा.नगराध्यक्ष रमेशसिंह परदेशी, हिंदु वॉरियर्सचे संस्थापक धिरजसिंह ठाकूर, निवृत्त मेजर अरुणसिंह ठाकूर, रविंद्र मिश्रा, सचिनसिंह ठाकूर, मनोजसिंह ठाकूर, किरणसिंह ठाकूर, विक्रम मिश्रा, ॲड. गोविंद कोटुळे, सत्यजितसिंह सद्दीवाल, लक्ष्मण गोरे, विशाल काशीद, समरजितसिंह ठाकूर, मदनसिंह सद्दीवाल, मदन दिक्षीत, ॲड. पृथ्वीराजसिंह सद्दीवाल, कुणाल जाधव, राहुलसिंह सद्दीवाल, संकेतसिंह ठाकूर, आशिषसिंह ठाकूर, सुधिरसिंह चौहाण, बल्ली ठाकूर, किरण पांडे,अमरसिंह ठाकूर, बंटी ठाकूर, ओंकार तबेलदार, आदर्शसिंह ठाकूर, यशसिंह परदेशी, हिंदु वॉरियर्सचे अध्यक्ष उमेश घाडगे, विकास साळुंके, मोहन दिक्षीत, चिया दिक्षीत पावन मिश्रा, संकेत शुक्ला, सुरजसिंह ठाकूर, अजय पांडे, तुषार पांडे, राज वळसंगकर, संग्या ठाकूर, रोहीत जाधव, यशसिंह ठाकूर, समाधान कोळेकर, विर मिश्रा, कार्तीक दिक्षीत, आनंद मोहिते, ओंकार काशीद आदी उपस्थीत होते.

## ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला बीओटी तत्त्वावर देऊन किल्ल्याचे संगोपनाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मे -**



शिवसेनेचे संसदरत्न श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली धाराशिव जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी यांच्या सोबत सेंट्रल बस स्थानक मुख्यालय मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला बीओटी तत्त्वावर देऊन किल्ल्याचे संगोपन व जतन करावे याबाबत निवेदन केले. त्याचबरोबर नळदुर्ग शहरातील ज्या व्यक्तींची भोगवटादार म्हणुन नगरपालिकेच्या दप्तरी नोंद आहे. त्या सर्वांना पंतप्रधान आवास योजना व रमाई आवास योजना या दोन्ही योजनांचा लाभ मिळावा. याकरीता शासन दरबारी प्रश्न उपस्थित केला आहे.

तसेच येथे स्पोर्ट क्लब स्टेडियम उभे करणे व नळदुर्ग शहर अतिक्रमण मुक्त करून नळदुर्ग शहराला विकसनशील बनवावे. त्याचबरोबर कुलदैवत श्री खंडोबा देवस्थान नळदुर्ग येथे मंदिर विकास निधी उपलब्ध करून देण्यासाठी पालकमंत्री व जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी यांच्यासमोर सर्व कामांना मान्यता द्यावी, अशी मागणी ज्ञानेश्वर घोडके यांनी केली आहे. यावेळी सहसंपर्क प्रमुखपदी पालकमंत्र्यांचे विश्वासु भगवान देवकते यांची निवड झाली आहे. त्यामुळे त्यांचा सत्कार मुंबई येथे करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, शिवसेना प्रवक्ते योगेश केदार आदी जण उपस्थित होते.

## तेरखेडा येथे महाराष्ट्र प्रीमियर लिग हॉलीबॉल स्पर्धेचा थरारक

### राज्याच्या कानाकोपऱ्यातून टीम झाल्या सहभागी



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ मे -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्र प्रीमियर लिग २०२५ अंतर्गत धकली हॉलीबॉल स्पर्धेचा थरारक रंगला आहे. यावेळी विविध फेरीत रंगतदार सामने प्रेक्षकांना अनुभवायला मिळत आहेत. तेरखेडा येथील जय हनुमान संघ ग्रुपच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासाठी पारितोषिक ठेवण्यात आले आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हॉलीबॉल टीम या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या.

महाराष्ट्र प्रीमियर लिग स्पर्धेत मोठ्या प्रमाणात हॉलीबॉल टीम सहभागी झाल्याने फायनल होण्यासाठी दोन दिवस उजाडण्याची शक्यता आहे. ही प्रीमियर लिग यशस्वी होण्यासाठी प्रशांत घुले, संघर्ष घोलप, अमर घोलप, शिव वाळके, पंकज इनामदार, सचिन मस्के, नीरज घुले, उत्कर्ष घोलप, विश्वजित मोहिते, प्रतीक मांडवकर, स्वप्निल हजारे, नितीन मस्के, तुषार कडवकर, मंगशे घुले, संकेत घुले, प्रथमेश हलकरे, यश जगताप, कृष्णा पौळ, वेदांत इनामदार व जय हनुमान हॉलीबॉल ग्रुपच्या आदि युवकांनी परिश्रम घेतला.

## धनंजय शिंगाडे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ मे -**



धाराशिव जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल धनंजय गंगाधर शिंगाडे यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा प्रतिष्ठित पुरस्कार त्यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने कराड येथे आयोजित ३१व्या नवोदित मराठी साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला.

गेल्या तीस वर्षांपासून धनंजय शिंगाडे यांनी धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव योगदान दिले आहे. त्यांनी विविध औद्योगिक संस्थांची स्थापना करून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. यासोबतच, बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी समाजातील सर्व जाती-धर्मांच्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी ३० पेक्षा अधिक संस्था उभारल्या आहेत, ज्या यशस्वीपणे कार्यरत आहेत.

या पुरस्कार सोहळ्याला सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, लोकशाही न्यूज चॅनेलचे विशाल पाटील, शरद गोरे राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे, आणि ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत प्रवीण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते शिंगाडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे ज्ञानेश्वर पतंगे, पत्रकार सुधीर पवार, संतोष वतने, अनिरुद्ध कावळे, शंकर अंगरखे, प्रवीण पौळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. धनंजय शिंगाडे यांच्या सामाजिक कार्याबरोबरच त्यांनी राजकीय क्षेत्रातही सक्रिय योगदान दिले आहे. त्यांच्या या व्यापक कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेने त्यांना या पुरस्काराने गौरवले आहे.

## नळदुर्ग शहरातील अंतर्गत रस्त्यात पडले मोठमोठे खड्डे; दुरुस्तीची मागणी

### ▶▶ रस्त्यांच्या कामावर खर्च होतोय कोट्यावधी रुपयांचा निधी...धाब्यावर बसून अंदाजपत्रकाची तयारी..

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.११ मे -**

नळदुर्ग शहरातील चावडी चौक ते बोरी घाटपर्यंतचा रस्ता अतिशय खराब झाला असुन या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यापुर्वी या रस्त्याच्या सिमेंटीकरणाचे काम नगरपालिकेने करावे अशी मागणी होत आहे.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नामुळे व त्यांनी मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिलेल्या निधीतुन नळदुर्ग शहरात कोट्यावधी रुपये खर्चाची कामे सुरु आहेत यामध्ये रस्त्यांच्या कामावर कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च होत आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग असेल किंवा नगरपालिका असेल यांनी ज्या ठिकाणी लोकवस्ती आहे किंवा ज्याठिकाणी रस्त्याची नितांत गरज आहे किंवा रस्त्याचे काम सुरु झाल्यानंतर त्या कामामध्ये अतिक्रमणाचा अडथळा येत आहे की नाही हे पहिल्याचे दिसुन येत नाही. प्रत्यक्षात जागेवर जावुन त्याठिकाणची पाहणी करून रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करणे गरजेचे होते. जेणेकरून जे रस्त्याचे काम मंजुर झाले आहे ज्या रस्त्याच्या कामासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मंजुर झाला आहे तो रस्ता विनाअडथळा होणे अपेक्षित होते.

मात्र, अनेक रस्त्यांची कामे एकतर त्या रस्त्याच्या कामात अतिक्रमणाचा अडथळा येत आहे म्हणुन ते काम होत नाही. त्याचबरोबर खंडोबा मंदिर ते महामार्ग पोलिस केंद्रासमोरील राष्ट्रीय महामार्गा पर्यंतचा रस्ता केवळ एक अतिक्रमण निघत नाही म्हणुन त्या रस्त्याचे काम थांबले आहे. वास्तविक पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या कामात येणारे प्रत्येक अतिक्रमण काढुनच त्या रस्त्याचे काम करणे गरजेचे आहे. अशा अडथळ्यामुळे आज मंजुर झालेल्या कांही रस्त्यांच्या कामाचा निधी परत जाण्याची शक्यता आहे.



आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग शहरात ज्याठिकाणी लोकवस्ती आहे. जे शहरातील प्रमुख रस्ते आहेत त्या रस्त्यांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देणे गरजेचे होते. आज नळदुर्ग शहरातील चावडी चौक ते बोरी घाट पर्यंतच्या रस्त्याची अवस्था अतिशय वाईट झाली आहे.या रस्त्यावरून आज पाई चालत जातांना त्रास होत आहे. या रस्त्यावरून वाहन



चालविणे अतिशय अवघड आणि धोकादायक झाले आहे. कारण या रस्त्यावर मल्लिकार्जुन मंदिर ते धर्मवीर संभाजी महाराज चौकापर्यंत मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्याचबरोबर याठिकाणी जी गटार बांधण्यात आली आहे ती फार जुनी आहे त्यामुळे याठिकाणी गटारच अस्तित्वात नाही. चावडी चौक ते बोरी घटपर्यंत बांधण्यात आलेल्या गटारीतुन पाणी वाहुन जात नाही त्यामुळे ज्याप्रमाणे सध्या खंडोबा मंदिर परीसर, जगतापनगर, मुळे प्लॉटिंग व वसंतनगर परीसरात जे सिमेंट रस्त्याचे काम व गटार बांधण्याचे काम सुरु आहे तशाप्रकारच्या रस्त्याची व गटार बांधणीचे काम शहरातील जे मुख्य दोन रस्ते आहेत यामध्ये बसस्टॅन्ड ते किल्ला गेट व चावडी चौक ते बोरीघाट या रस्त्यांची कामे होणे गरजेचे आहे. कारण हे दोन्ही रस्ते अतिशय महत्वाचे आहेत. किल्ला पाहण्यासाठी जाणारे पर्यटक याच रस्त्यावरून किल्लयात जातात. त्याचबरोबर हे दोन्ही रस्ते मिरवणुक मार्गही आहेत त्यामुळे या दोन्ही रस्त्याची कामे पावसाळ्यापुर्वी होणे गरजेचे आहे अन्यथा पावसाळ्यात या रस्त्यावरून जाताच येणार नाही. नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी तात्काळ या रस्त्यांची कामे मार्गी लावावेत अशी मागणी होत आहे.

# नांदेडमध्ये गोळीबार

## एक ठार; एक जखमी



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड , दि. ११ मे-**

तीन जणांमध्ये वाद होऊन एकाने दुसऱ्यावर गोळीबार केला. यात एक जण ठार झाला तर अन्य एक गंभीर जखमी झाला. वसरणी येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळ रविवारी सकाळी ११ वा. ही घटना घडली. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

दोन महिन्यापूर्वीच शहरातील गुरुद्वारा परिसरात घडलेल्या गोळीबाराची घटना घडली होते. तर पुन्हा आज दि.११ मे रोजी सकाळी पुन्हा एकदा गोळीबाराने नांदेड शहर हादरले. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला आशु पाटील उर्फ कमलेश लिंबापुरे यांच्यासह शेख परवेज, तेजासिंग बावरी या तिघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद सुरू होता. प्रारंभी किरकोळ असलेला हा वाद टोकाला जाऊन यातून कमलेश लिंबापुरे उर्फ आशु पाटील याने शेख परवेज व तेजासिंग बावरी यांच्यावर गोळी झाडली. यात शेख परवेज (वय २५) हा जागीच ठार झाला तर त्याच्यासोबत असलेला तेजासिंग बावरी हा जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी घटनास्थळाला भेट दिली असून या गोळीबारात जखमी झालेल्या तेजासिंग बावरी याला रुग्णालयात दाखल करण्यात आले असुन त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

# पक्षात योग्य मान सन्मान, वाऱ्यावर सोडणार नाही : अजित पवार

**साईनाथ कोटगीरे**
**बाऱ्हाळी , दि. ११ मे-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून पक्षात प्रवेश करणाऱ्यांना पक्षामध्ये योग्य तो मानसन्मान दिला जाईल, खंबीरपणे पाठीशी उभे राहणार आहे पक्ष कदापिही वाऱ्यावर सोडणार असे चव्हाणवाडी येथील पक्ष प्रवेश तथा पक्ष मेळाव्यात उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांनी असा विश्वास कार्यकर्त्यांना दिला.

चव्हाणवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवेश व कार्यकर्ते मेळाव्या च्या अध्यक्ष स्धानी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार ,,उच्च व तंत्र शिक्षण तथा सा.बा.मंत्री इंद्रनील नाईक, आ.प्रतापराव पा.चिखलीकर, आ.संजय बनसोडे, आ.विक्रम काळे ,माजी मंत्री भास्करराव पा.खतगावकर, माजी आ.अविनाश घाटे, ओमप्रकाश पोकर्णा, दिलीपराव धर्माधिकारी ,व्यंकटराव पा.गोजेगावकर, रामदास पा.सूमठाणकर, जिवन घोगरे माजी आ.मोहनराव हंबर्डे यांच्या उपस्थितीत काँग्रेसचे प्रदेश सचिव ईंजी.शेषराव चव्हाण ,सूशांत चव्हाण ,(माजी सभापती क्र.उ.बा.स.) प्रा.उदय चव्हाण (माजी नगरसेवक नांदेड) ,संतोष राठोड(माजी जि.प.सदस्य) ,दिलीप कोडगीरे (जि.प्रवक्ता काँग्रेस)यांच्या सह अनेक जि.प.सदस्य, सरपंच, चेअरमन यांना विविध पक्षातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजितदादा पवार यांच्या हस्ते प्रवेश देण्यात आला.



प्रास्ताविकात शेषराव चव्हाण यांनी अजितदादा यांची काम करण्याची शैली रोखठोक स्वभाव पाहून पक्ष प्रवेशाच्या मागची भूमिका मांडली व पक्ष जि जबाबदारी देईल ती स्विकारुन पक्ष कार्यात झोकून देण्याची जबाबदारी स्वीकारली.

कार्यकर्त्यांना संबोंधीत करतांना अजितदादा म्हणाले की, राज्य सरकार विकासाच्या मार्गावर धावत आहे ,चांद्या पासून बांद्या पर्यंत विकास होत आहे ,सरकार शेतकऱ्यांचे,कष्टक-यांचे आहे .विकास थांबनार नाही. लाडकी बहिण योजना कदापि बंद होणार नाही विविध बँकांच्या माध्यमातून उद्योग, व्यवसायांना कर्जे पूरवठा करुन त्याचा हप्ता लाडकी बहिण योजनेतून कपात करण्यात येईल यातून महिला सशक्तीकरण करणार,अफवांवर विश्वास ठेऊ नका.

नवे व जुने असा भेद न करता वज्रमूठ उभारून पक्षाला नवी उभारी देण्यात येत आहे असे मत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी चव्हाणवाडी येथील पक्ष प्रवेश व कार्यकर्ता मेळाव्यात उपस्थित त्यांना बोलताना दिली. महाराष्ट्र शासन हे गोरगरिबाचे शासन असून सांध्यापासून ते बांधापर्यंत विकासाच्या मार्गावर धावत आहे राज्य आता थांबणार नाही लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या अडचणीच्या दृष्टीने त्यांनीही दिलासा देण्याचा प्रयत्न केला घळभरणी होत असेल तरीही काही अडचणी असतील त्या अडचणी आम्ही दूर करू प्रकल्पग्रस्तांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही त्यांना मूलभूत सुविधा पुरवणीच्या दृष्टीने सूचना केलेले आहेत ,मराठवाडा पाणी ग्रीडच्या माध्यमातून गोदावरीच्या खोऱ्यात अवांतर पाणी वळवले जाणार आहे त्यातून मराठवाड्याच्या पाण्याच्या दृष्टीने गरज भागवली जाणार आहे शेतकऱ्यांना आता मोफत वीज दिली जात आहे .शेषराव चव्हाण यांच्या पक्षप्रवेशाने पक्ष वाढीला मदत होणार आहे पक्षाला चांगल्या माणसांची गरज आहे पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून प्रवेश करणाऱ्यांच्या मागे भक्कमपणे राष्ट्रवादी काँग्रेस उभी राहणार असा ठाम विश्वासही त्यांनी दिला पक्षातील जुन्या व नव्यांना एकत्र करून त्यांची वद्ज्रमूठ बनवून पक्षाला एका उंचीवर नेण्याचे ध्येय ठेवलेले आहे सर्वांनी चांगल्या कामाच्या पाठीमागे राहावे असे आवाहन केले. या वेळी अजितदादांच्या हस्ते कै. भिमराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयाच्या ईमारतीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच तमलूर येथील शहिद जवान सचिन वंजे यांच्या कूटूबियांना ऐक कोटि रु.मदत देण्यात येणार असल्याचे सांगितले.या वेळी व्यासपीठावर जि.प.च्या माजी अध्यक्षा सौ.वैशालीताई चव्हाण , जि.प. चे माजी सभापती स्वप्निल चव्हाण ,मिनलताई खतगावकर, सूरजीतसिंघ गिल, बाळासाहेब रावणगावकर, मूक्तेश्वर धोंडगे, माधव पावडे, शिवराज पा.होटाळकर, प्रविण पा.चिखलीकर,बाबूराव कदम ,यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते.

**स्वप्नील चव्हाणांनी केला मेळावा यशस्वी**

भारत पाकिस्तान यांच्यात होत असलेल्या यूध्दसद्रश्य परीस्थितीतीचे सावट असल्याने मेळावा अनिश्चिततीच्या गर्तेत होती पण आ.प्रतापराव पा.चिखलीकरयांच्या मार्गदर्शनाखाली माजी सभापती स्वप्निल चव्हाण यांनी विशाल मेळावा यशस्वी करुन दाखविला .

**पाकिस्तानला जशास तसे उत्तर: अजित पवार**

यानंतर जर पाकिस्तानने भारतावर अतिरेकी हल्ला केल्यास आमचे सैन्य जश्याच तसे उत्तर देतील. व आम्ही कदापि ते सहन करणार नाही. व त्याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नसल्याचा इशारा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिला.

## संक्षिप्त वृत्त

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोहळ्याच्या अध्यक्षपदी काकडे तर उपाध्यक्षपदी कानोडे

**अर्धापूर** -अर्धापूर तालुका पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जन्मोत्सव सोहळ्याच्या अध्यक्षपदी अजिंक्य नरसिंहराव काकडे यांची तर उपाध्यक्षपदी हरीभाऊ विठ्ठलराव कानोडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड शुक्रवारी (ता.९) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर, अर्धापूर येथे करण्यात आली. राजमाता, राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भव्य दिव्य, विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अर्धापूर तालुका पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जन्मोत्सव सोहळ्याच्या कार्यकारिणीची निवड पुढीलप्रमाणे करण्यात आली. अध्यक्ष अजिंक्य नरसिंगराव काकडे, उपाध्यक्ष हरीभाऊ विठ्ठलराव कानोडे, सचिव आकाश किशनराव साखरे, सहसचिव गोविद नागोराव कानोडे, कोषाध्यक्ष तुकाराम बालाजीराव माटे, सहकोषाध्यक्ष तिरूपती बारसे, सदस्य छत्रपती मारोतराव कानोडे, नवनाथ चंपतराव बारसे, तुकाराम रामजी साखरे, योगेश नारायण हाळदे, ज्ञानदीप सुर्यभान साखरे, राजेश पिराजी साखरे, शंकर करांडे, साहेबराव एकनाथराव गोरे, शिवाजी कामाजी साखरे, राजेश गंगारामजी कानोडे, गोविंद बबनराव बारसे, अनिल गणपती कानोडे, गणपती गोविंद बारसे, नागेश भाऊराव आव्हाड, साहेबराव सुदामराव बारसे, मारोती शंकरराव बारसे,कमलाजी होळकर, विनोद साखरे,कामाजी बारसे , अशोक कानोडे, व्यंकटेश लंगडे, काशीराम साखरे, रामदास दाळपूसे, विठ्ठल कानोडे, श्रीराम बारसे, सचिन होळकर,अजय बारसे, नारायण साखरे, सचिन जटाळे, गजानन जटाळे,विजय बारसे, बालाजी बारसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.




### तालुक्यातील पत्रकारांसाठी लवकरच माहूर येथे पत्रकार भवन उभे राहणार : नाईक

**माहुर** -प्रातिनिधिक लोकशाहीचा मुख्य स्तंभ म्हणजे विधिमंडळ जे लोकशाहीचा पहिला स्तंभ देखील आहे. प्रातिनिधिक लोकशाहीचे चार शक्तिशाली स्तंभ म्हणजे आहेत कायदेमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका आणि माध्यम म्हणजेच प्रातिनिधिक लोकशाहीचा चौथा स्तंभ माध्यम प्रेस, मिडिया पत्रकारिता आणि हा स्तंभ राज्यात आजही बिन खांबाच्या इमारतीखाली दबलेला आहे. व्यक्त व्हायला सदसद्विवेकबुद्धी, सेवाभावी भावना, कणखर लेखनी हे सर्व काही असूनही हक्काच्या एकछत्री घरापासून आजही वंचित आहे. नेमकी हिच गरज लक्षात घेऊन शिवसेना माहूर तालुका प्रमुख सुदर्शन नाईक यांनी माहूर तालुक्यातील पत्रकारांसाठी पत्रकार भवन उभारुन देण्याची तयारी दर्शविली असून, या महत्त्वाच्या विषयावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आ.हेमंत पाटील यांच्याशी चर्चा झाली असून, नगरपंचायत प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिल्यास लवकरच माहूर येथे पत्रकार भवन उभे राहणार असल्याचे नाईक यांनी सांगितले आहे. माहुर तालुक्यातील सर्व पत्रकारांसाठी एक सुसज्जित पत्रकार भवन शिवसेनेचे युवानेते तालुका प्रमुख सुदर्शन नाईक याच्या संकल्पनेतून साकार होणार आहे. नाईक यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिन्दे व आ. हेमंत पाटील याच्याशी याविषयावर चर्चा केली असून, नगरपंचायत प्रशासनाकडून पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून घ्या मी निधी उपलब्ध करून देतो असे आश्वासन आ.हेमंत पाटील यांनी दिल्याचे नाईक यांनी सांगितले आहे. यामुळे माहुर शहरात आता लवकरच तालुक्यातील सर्व पत्रकारांसाठी सुसज्ज अशी पत्रकार भवन इमारत तयार होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. असे झाल्यास पत्रकार जो एक व्यापक शब्द आहे जो वर्तमानपत्रात, लेख, टीव्ही रिपोर्ट किंवा ऑनलाइन सामग्री अशा विविध स्वरूपात बातम्या गोळा करतो, लिहितो आणि सादर करतो समाजातील प्रत्येक घटकाला सूचित करतो. पत्रकार राजकारण, व्यवसाय, मनोरंजन किंवा क्रीडा अशा अनेक क्षेत्रात काम करतात आणि ते तपासात्मक भाग, वैशिष्ट्ये किंवा सामान्य बातम्यांवर लक्ष केंद्रित करून प्रशासनाच्या चुका, भ्रष्टाचार, अन्यायाविरुद्ध आवाज उठवत समाजाला योग्य आरसा दाखवतात अशा या माध्यमांच्या प्रतिनिधींना आपल्या लिखाणातून व विचार विनिमयातून चर्चा व लिखान करण्यासाठी पत्रकार भवन हे एक हक्काचे वास्तु ठिकाण उपलब्ध होणार आहे.




### प्रतीक सोनवणे अमेरिकेत एम.एस. मास्टर्स डिग्रीने सन्मानित



**नांदेड** -मुळचा नांदेड येथील प्रतीक संजयकुमार सोनवणे यांनी अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्सॉस ॲट अर्लिग्टंन येथून एम.एस. डिग्री (इंजिनिअरींग) पूर्ण केली. दोन वर्षांच्या कोर्समध्ये प्रतीक सोनवणे यांनी देदीप्यमान यश मिळवित अमेरिकेत नांदेडचे नाव उज्वल केले. तेथील विद्यापीठाचे मान्यवर पदाधिकारी तसेच प्राध्यापकांच्या हस्ते प्रतीक सोनवणे यांना पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

# चंद्रबोधी यांचे आज प्रवचन



**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. ११ मे-**

तरोडा बु परिसरातील वैशालीनगर येथील दीपंकर कुंज विहार येथे बौद्ध पौर्णिमेनिमित्त धम्मचारी अनागारिक चंद्रबोधी यांचे दि. १२ मे रोजी सकाळी साडेदहा वाजता जाहीर प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

या प्रवचनासाठी जिल्ह्यातील सर्व बौद्ध बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्रिरत्न बौद्ध महासंघ नांदेडचे चेअरमन पद्मगर्भ व पद्मसेन यांनी केले आहे.

# इस्लापूर जनतेची तहान भागवण्यासाठी स्थानिकचे प्रशासन कुचकामी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर , दि. ११ मे-**

किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील ग्रामपंचायत तालुक्यात सर्वात मोठी असून दरवर्षीच्या उन्हाळ्यात येथील प्रशासन स्थानिकच्या जनतेला पाणीपुरवठा करण्यासाठी कुचकामी ठरत असल्याचे चित्र आहे.

सध्याच्या स्थितीमध्ये येथील जनता हंडाभर पाण्यासाठी वन वन भटकंती करत आहे. तरी देखील येथील ग्राम विकास अधिकारी पाणीपुरवठा संदर्भात कोणत्याही अधिकाऱ्यांच्या दलनात इस्लापूर वाशियांसाठी प्रयत्न न करत असल्याचे कळते,

जीवन प्राधिकरण अंतर्गत इस्लापूर येथे अंदाजे ७ ते ८ कोटींची पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू झाले होते संबंधित गुत्तेदाराच्या विषयी इस्लापूर करांनी अनेक तक्रारी दिल्या परंतु संबंधित गुत्तेदाराचे वरील राजकीय लोकांशी काय धागेदोरी आहेत कळत नसून त्यांनी पाणीपुरवठ्याचे काम पूर्ण झाल्याचे जाहीर केल्याचे कळते

परंतु गावात सदरील योजनेचे पाणीच आले नाही स्थानिक च्या प्रशासनाने अनेक हतुंडे वापरून बघितले परंतु इस्लापूर गावकऱ्यांचे पाणी प्रश्न काय मिटता मिटत नसून गावकऱ्यांची तहान कशी भागवणार हे मात्र बघण्याची चित्र आहे .



**कुंडलवाडी- येथुन जवळ असलेल्या नागणी येथील दत्त मंदिरातील दान पेटी फोडणाऱ्या आरोपी सुनील बाळोजी हमंद व गजानन मलेश भूरावार यांना अटक करून त्यांच्याकडुन ५ हजार २०० रोख व पन्नास हजार रुपयाची हिरो होंडा कंपनीची मोटार सायकल असे एकूण पंचावन्न हजार दोनशे दोन रुपयाचा मुद्देमाल कुंडलवाडी पोलीसांनी जप्त केला.**

# बेपत्ता महिलेच्या अंगावरील दागिने काढून घेऊन खून

**तभा वृतसेवा**
**निवघा बा. , दि. ११ मे-**

हस्तरा येथील खंडोबाची कट्टर भक्त असल्यामुळे पुजारी म्हणून मान असलेली वृद्ध महिला सिताबाई रामभाऊ फुले वय ८४ वर्षे काल सायंकाळपासून खंडोबाच्या दर्शनाला गेली ती वापस आली नाही. आज सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास या महिलेचा मृतदेह मंदिराच्या जवळ असलेल्या एका ऊसाच्या शेतात आढळून आला. या महिलेच्या अंगावरील दागिने मात्र गायब होते. त्यामुळे हा खुनाचाच प्रकार असावा असा संशय व्यक्त केला जात आहे.



हदगाव शहरापासून वायव्य दिशेस सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर हस्तरा हे गाव आहे. या गावाच्या शेजारी खंडोबाचे अत्यंत पुरातन असे मंदिर आहे. सध्या या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला असून हे मंदिर गावापासून अंदाजे २५० मीटर अंतरावर आहे. या मंदिरातील खंडोबाच्या पुजा व सर्व उपासना विधीचा मान फुले कुटुंबाकडे आहे. यात कुटुंबातील सीताबाई रामभाऊ फुले ही महिला होती.

या भागात मोठ्या प्रमाणात ऊसाचे उत्पादन घेतले. जाते. या मंदिराच्या परिसरात सुद्धा ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात केलेली आहे. काल सायंकाळी ही महिला गावात आली होती. या महिलेच्या नातवाने ती फुले तोडत असतांना सायंकाळी सहा वाजता बघितले होते. त्यानंतर सायंकाळी पुन्हा ही महिला घरी आली नसल्यामुळे सर्वांनी महिलेचा शोध घेतला. संपूर्ण गावकऱ्यांनी या महिलेचा गावात व शेतशिवारात सर्वत्र शोध घेतला. परंतु ही महिला आढळून आली नाही. सकाळी सुद्धा एक वेळ गावकऱ्यांनी सर्वत्र शोध घेतला. परंतु या महिलेचा कुठे थांबतात लागला नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी व कुटुंबीयांनी पोलीसांना माहिती कळवण्याचा निर्णय घेतला. शेवटी आज दुपारनंतर हदगाव पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी सदर महिलेचा नातू सागर बंडू फुले यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीत सागर फुले यांनी म्हटले आहे की माझी आजी काल सायंकाळी सहा वाजता पूजेसाठी पंकज सोळंके यांच्या घराजवळ फुले तोडतांना दिसली होती. त्यानंतर काही ती दिसली नाही. या महिलेचे वर्णन खालील प्रमाणे रंग- गोरा, मध्यम बांधा, उंची अंदाजे पाच फूट, अंगावर मोरपंखी रंगाची नाऊवार साडी, डोळ्याला चष्मा थोडी वाकून चालते. असे तिचे वर्णन असून तिच्या कानात सोन्याच्या बाळ्या, हातात चादीचे कडे, गळ्यात सोन्याची पोत व मणी असे दागिने होते. त्यांच्या या तक्रारीवरून हदगाव पोलिसांनी मिसिंगची नोंद घेतली असून त्यानंतर गावात गेले असता काही लोकांनी या महिलेचे प्रेत मंदिराच्या आणि गावाच्या मध्यंतरी एका शेतात आढळून अल्याचे सांगितले. सदर महिलेचे कान तोडून कानातील बाळ्या नेल्या. तसेच हातातील चांदीचे कडे आणि सोन्याची पोत सुद्धा आढळून येत नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी हस्तरा येथील सरपंच सोळंके यांनी आमचे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, सदर महिला अत्यंत मनमिळावू व गोड स्वभावाची होती. त्यामुळे द्वेषाने किंवा भांडणातून हा प्रकार घडला नसावा. दागिन्याच्या चोरीसाठी हा प्रकार झाला असावा असा संशय त्यांनी व्यक्त केला. उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा करण्याबाबत मार्गदर्शन केले. स्वानपथक व फिंगर प्रिंट एक्सपर्ट ला प्रचारण करण्यात आले होते

# तरुण भारतच्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. ११ मे-**

किनवट राज्यातील ज्येष्ठ, संघविचाराला वाहून गेलेल्या आणि आपल्या वाचनीय आणि अभ्यासपूर्ण बातम्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या दै. तरुण भारत या वृत्तपत्राचा वर्धापन दिन किनवट तालुक्यात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने तालुक्यातील विकासात्मक घोडदौडीचे सविस्तर विश्लेषण करणारा विशेषांक प्रकाशित करण्यात आला. या विशेषांकामध्ये आमदार भिमराव केराम यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आपले शुभेच्छा संदेश प्रसिद्ध केले.



या विशेषांकाचे प्रकाशन जंगो रायताड प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रतिक केराम यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष दिनकर चाडावार, व्यापारी संघाचे उपाध्यक्ष फिरोज हिराणी, आनंद मच्छेवार, मंडळ अध्यक्ष उमाकांत क-हाळे पाटील, माजी युवामोर्चा अध्यक्ष सागर पिसारीवार, आरोग्यदूत अमन कुंडगीर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे, तालुक्यातील विविध घडामोडींवर सतत लक्ष ठेवणारे व पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक भान जपणारे पत्रकार अनिल भंडारे, दत्ता जायभाये, कचरू जोशी आणि दै. तरुण भारतचे तालुका प्रतिनिधी मधुकर अन्नेलवार यांचीही उपस्थिती कार्यक्रमात होती.

कार्यक्रमात बोलताना ॲड. प्रतिक केराम यांनी दै. तरुण भारतच्या सशक्त पत्रकारितेची स्तुती करत, या वृत्तपत्राने गेली कित्येक दशके सामाजिक भान जपत लोकशाही बळकट करण्याचे कार्य केले आहे. विशेषांकाच्या माध्यमातून तालुक्यातील विकासात्मक वाटचालीचे दस्तऐवजीकरण होणे ही काळाची गरज आहे, असे मत व्यक्त केले.

विशेषांकामध्ये तालुक्यातील शैक्षणिक, आरोग्य, कृषी, नागरी सुविधा, रोजगार, महिला सबलीकरण, युवा नेतृत्व आणि पायाभूत सुविधा या विषयांवर सविस्तर लेखन करण्यात आले असून अनेक लोकप्रतिनिधींनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या मते व विकासदृष्टीकोन सादर केला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर अन्नेलवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार अनिल भंडारे यांनी मानले. या कार्यक्रमामुळे तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक संवादास नवे आयाम प्राप्त झाले असून वाचकांमध्ये विशेषांकाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# भाजपचे शरद पवार यांच्या सहकार्यामुळे तरुणांच्या हातावर शस्त्रक्रिया

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ११ मे-**

जुन्या शहरातील तरुणांची कडबा कुटी मध्ये नजर चुकीने मनगटातुन हात कट झाला, हि वार्ता शहरात वाऱ्यासारखी पसरली, ही वार्ता ऐकुन भाजपचे शरद पाटील पवार यांनी तरुणाला भेट देण्याचे ठरवले, घटनास्थळावरील परिस्थितीची पाहाणी करुन ,खर्चाचा विचार न करता गंगा हास्पीटल मध्ये दाखल केले गंगा हास्पीटलमधील तज्ञ डॉक्टरच्या टिमने १२ तासांच्या शस्त्रक्रियेनंतर हाताला नवे रोपन केल्यासारखे नविन जीवन दान दिले.

शहरातील पवार कुटुंब जुन्या शहरात कायम वास्तवेला आहेत.या कुटुंबातील तरुण घरच्या जनावराला कडबा कुटीने चारा बारिक करुन देत असताना कडबा कुटीमध्ये नजर चुकीने तरुणांचा हात आतमध्ये जाऊन मनगटातुन कट झाला या प्रक्रियेत तरुणांचा मनगटातुन हात पूर्णपणे कापला गेला त्यामुळे हाताच्या बोटाची रक्तवाहिन्या पुर्णतः बंद झाल्या व बोटांची हालचाल बंद झाली आणी बोटावरील नियंत्रित करणारे स्नायु, संवेदना पोहोचवणाऱ्या नसांचा पूर्णपणे संपर्क बंद झाल्यामुळे ही स्थिती अत्यंत गंभीर व भयानक दृश्य दिसुन येत होते.

बघणाऱ्याला असे वाटत होते. तरुणाला हात गमावण्याची वेळ आली पण या ठिकाणी तरुणाची वार्ता समजल्याने शरद पाटील पवार यांची देवदुत्ता सारखी रुग्णांना मदत झाली, विलंब न लावता लोहा येथुन नांदेड येथील श्री गंगा हास्पीटल मध्ये दाखल करण्याचा तात्काळ विचार केला हास्पीटलमध्ये दाखल केले .या ठिकाणी रुग्णांवर खर्चीक बाब दिसुन येत होती पण कुठलाच विचार न करता डॉक्टराना विस्वासात घेतले आणी त्याठिकाणी हाजर राहुन कुटुंबाला आधार दिला . या कुटुंबाला ऐवडा खर्च पेलण्याची बाब दिसुन ये नव्हती तरी शरद पवार यांनी या खर्चाची हामी घेतली आणि तात्काळ उपचाराला सुरु झाला इतर दवाखान्यात किंव्हा हाडांच्या हास्पीटलमध्ये दाखल केले आसते तर प्रथम रुग्णांनाला बघुन डॉक्टर सल्ला देत होते लोंबत असलेला हात तोडावा लागेल असे सांगत होते. पण शरद पवार यांनी योग्या वेळी,योग्य निर्णय घेतल्याने तरुणाच्या हातावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली.शस्त्रक्रियेनंतर पुन्हा जशास तशे हाताची हालचाल सुरु झाली. हिच बाब इतर दवाखान्यात दाखल केले असते तर आगोदर अनामत भरा नंतरच उपचाराला सुरुवात केली असती हि खर्ची बाब आहे असे सांगितले आसते.या सल्लूयाने इतरतर फिरुण तरुणांला हात गमवावा लागला आसता. पण गंगा हास्पीटलमधील डॉक्टरने रक्कम न भरुन घेता यशस्वी शस्त्रक्रिया केली. शरद पवारांच्या विनतीवरुन विलंब न लावता रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर डॉ. आशिष कोकाटे एम.ए१च. प्लास्टिक सर्जन, डॉ. राजेश्वर पवार ऑर्थोपेडिक सर्जन, डॉ. विजय कागणे व डॉ.सौ कागणे आणि डॉ. पवन मल्लमवार (भूलतज्ञ) एकत्र येवून सलग १२ तासांची जटिल यशस्वी शस्त्रक्रिया केली.या शस्त्रक्रियेत तुटलेल्या हाडांचे पुनःजोड, रक्तवाहिन्यांचे आणि नसांचे सूक्ष्म शिवण, तसेच हाताच्या हालचाली व संवेदनशीलता परत मिळवण्यासाठी अत्यंत कुशलतेने काम करण्यात आले.

या प्रयत्नांमुळे रुग्णाचा हात पुन्हा कार्यक्षम झाला असून, श्री गंगा रुग्णालयाने पुन्हा एकदा अत्युत्कृष्ट वैद्यकीय सेवांचे उदाहरण जनतेसमोर सादर केले आहे.शरद पाटील पवार व श्री गंगा हास्पीटलमध्यील तज्ञ डॉक्टराचे सर्व स्तरातुन धन्यवाद मानत आहेत.